06 TO 12 APRIL 2026 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 4/5/2026 7:48 PM Page 1

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १४ | अंक : १२ | सोमवार दि. ६ एप्रिल २०२६ ते रविवार दि. १२ एप्रिल २०२६ | पाने : ८ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ संभाजीनगर ■ लातूर ■ धाराशिव ■ सोलापूर ■ नांदेड


## अथर्वची स्वप्ने अर्ध्यावर सरली शोभायात्रा अंतिम यात्रा ठरली

नागपूर : क्राईम रिपोर्टर

सन आणि उत्सव यात लहान मुले मोठ्या उत्साहाने भाग घेतात. पण कधी कधी त्यांचा हाच उतावळापणा त्यांच्यासाठी काळ ठरतो. नगर मधील गिट्टीखदान भागात हनुमान जयंतीच्या शोभायात्रेत सहभागी झालेल्या १४ वर्षाचा मुलगा बेपत्ता झाला आणि त्याचा मृतदेह एका ठिकाणी गोनीत सापडला. मृतदेहावर मारहाणीच्या खुणा असल्याने ही हत्या असल्याचे बोलले जात आहे. पण ती कोणी आणि का केली याचा पोलिस तपास करीत आहेत. ...पान २ वर

## जमिनीच्या तुकड्यासाठी बाप आणि भावाशी वैर धरले रागाच्या भरात कुऱ्हाडीचे घाव घालून दोघांनाही ठार मारले






हातकणंगले : क्राईम रिपोर्टर

आजकाल पैसा आणि जमीन जायदाद याच्या लोभापायी माणूस रक्ताची नातीही विसरून जातो. ग्रामीण भागात शेतजमीन हेच उपजीविकेचे प्रमुख साधन असल्याने शेती करणारा शेतकरी एक इंचही जमीन सोडायला तयार होत नाही. जमिनीवर पोटच्या पोराप्रमाणे त्याचे प्रेम असतात. त्यामुळे जमिनीसाठी तो कोणत्याही थराला जावू शकतो. अगदी नात्या गोत्याचाही विचार करीत नाही. म्हणूनच ग्रामीण भागात जमिनीवरून रक्ताच्या नात्यात सुद्धा रक्ताचे पाट वाहतात. जमिनीचा वाद जर भावकीत मिटला नाही तर न्यायालयात जातो आणि तिथेही मिटला नाही, मात्र जमिनीच्या वादातून एखाद्याचा जीवही जावू शकतो. जमिनीच्या वादाचा आजवरचा इतिहास पाहता. मुलांनी वडिलांची, भावाने भावाची दिराने वाहिनीची भवानी बहिणीची हत्या केल्याच्या घटना घडलेल्या आहेत. कारण प्रत्येकाला जमीन जागेचा मोह असतो आणि त्यापुढे रक्ताचे नाते तसेच माणुसकी सारेकाही फिके ठरते. वास्तविक मुले मोठी झाली की आई-वडील आपल्याकडील संपत्ती किंवा जमीन आदीची समान वाटणी करतात. पण बऱ्याच वेळा आई-वडिलांनी केलेली जमिनिची किंवा इतर संपत्तीची वाटणी मुलांना मंजूर नसते. कारण त्यातील प्रत्येकाच्या मनात आपल्याला कमी मिळाले आपल्यावर अन्याय झाला अशी भावना निर्माण झालेली असते आणि त्यातूनच रक्ताच्या नात्यात रक्त सांडले जाते. हातकणंगले तालुक्यातील हिंगणगाव येथील मारुती कुंडले यांनी त्याच्या जमिनीची दोन मुलांमध्ये वाटणी करून दिली, पण थोरला मुलगा संभाजी याला ही वाटणी मंजूर नव्हती. २० गुंठे आपल्याला कमी मिळाले असा त्याचा दावा होता, त्यावरून त्याचे वडील आणि भावाबरोबर नेहमी भांडण व्हायचे आणि याच वादातून त्याने एके दिवशी वडील आणि भावावर कुऱ्हाडीचे घाव घालून त्यांची हत्या केली. या प्रकरणी संभाजीला अटक करण्यात आली आहे.

हातकणंगले तालुक्यातील हिंगणगाव कुंभोज रस्त्यावर कुंडले वस्तीत मारूती कुंडले यांची शेती आणि घर आहे. शेतातच त्यांनी मोठे घर बांधले असून तेथे ते पत्नी, मुले नातवंडासह रहायला आहेत. त्याची एकुन तीन एकर शेती असून त्या शेतीवरच घर गाडा चालू आहे. मारूती कुंडले याचे वय झाले असल्याने त्यांनी आपल्या हयातीत शेतीची आणि घराची वाटणी दोन्ही मुलात समसमान केली. त्याचा मोठा मुलगा संभाजी आणि धाकटा मुलगा शीतल हे दोघे ही शेती बरोबर हातकणंगले येथील एमआडीसीत एका कंपनीत कामाला ही आहेत. घर तेथे भांडण हे असतेच त्याप्रमाणे कुंडले याच्या कुटूंबात ही भांडणे होत होती. मोठा मुलगा संभाजी याला वडिलांनी केलेली शेतीची वाटणी मान्य नव्हती. त्याच्या मते तीन एकर शेतीमधील २० गुंठे शेत जमीन ही वडिल आणि धाकटा भाऊ याचेत जास्त गेलेली आहे. २० गुंठे शेत जमीन ही त्या दोघांनी जाणीव पुर्वक आपल्याकडून जास्त घेतलेली आहे.त्या २० गुंठयाबाबत संभाजी हा सारखा वडिलांच्या बरोबर आणि धाकटा भावाबरोबर सारखा वाद घालत भांडण करीत होता. त्यातच आई वडिल हे धाकट्या भावाकडे राहत असल्याने त्यांनी आपल्या हिश्याची शेत जमीन ही मुद्दामच धाकटया भावाला जास्त दिलेली ...पान २ वर

## चारित्र्याच्या संशयाचा भयंकर शेवट झाला मित्राच्या मदतीने पतीने पत्नीचा खून केला

विरार : क्राईम रिपोर्टर



सध्याची परिस्थिती पाहता पती पत्नीमधील विश्वासाचे नाते आता पूर्वीसारखे राहिलेले नाही. कारण जे लोक नोकरी धंद्यानिमित मुंबईला राहतात आणि त्यांचे कुटुंब गावी असते. अशा नोकरदार पुरुषांच्या मनात नेहमीच गावी राहणाऱ्या त्याच्या पत्नी विषयी संशयाची भावना असते. उत्तर प्रदेशातील एका खेड्यात राहणारा व सध्या नोकरीनिमित्त नालासोपाऱ्यात राहणाऱ्या रोषण यादव याचा त्याची पत्नी मधुबाला हिच्या चारित्र्यावर संशय होता. त्यावरून दोघांमध्ये भांडणे व्हायची. अखेर रोशनने मधुबालाचा काटा काढायचे ठरवले. त्यासाठी त्याने तिला नालासोपाराला बोलावले आणि वज्रेश्वरीला फिरायला नेले. तिथे त्याने तिला एका निर्जन स्थळी नेवून मित्राच्या मदतीने तिची हत्या केली व मृतदेह फेकून दिला. मात्र पोलिसांनी घटनास्थळी मिळालेली माहिती तसेच सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपी रोषण व त्याचा मित्र भानुप्रताप या दोघांना अटक केली.






आठ दिवसांपूर्वी मांडवी पोलीस ठाण्याच्या हद्दीत महिलेचा गळा चिरून करण्यात आलेल्या हत्येचा विरार गुन्हे शाखा कक्ष ३ च्या पथकाने उलगडा केला आहे. चारित्र्याच्या संशयावरून स्वतःच्या पत्नीची गळा चिरून आणि डोके दगडाने ठेचून क्रूरपणे हत्या करणाऱ्या पतीसह त्याच्या साथीदाराला पोलिसांनी अटक केली आहे. मुख्य आरोपी रोशन रामजग यादव (२६) व साथीदार भानुप्रताप विजय बहादूर यादव (३०) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. २१ मार्च २०२६ रोजी ...पान २ वर

## 'लिव्ह इन...' मधला संपला लळा प्रियकराने आवळला प्रेयसीचा गळा

चंद्रपूर : क्राईम रिपोर्टर



'लिव्ह इन...' मधील नाती औट घटकेची असतात. कारण अशी माती शारीरिक आकर्षणातून निर्माण झालेली असतात. त्यामुळे ती फार काळ टिकत नाहीत. चंद्रपूर जिल्ह्याच्या दुर्गौर मध्ये पायापासून विभक्त राहणाऱ्या एक महिलेचे तिच्यापेक्षा ७ वर्षांनी लहान असलेल्या तरुणाशी अनैतिक संबंध होते. दोघेही लिव्ह इन रिलेशनशिप मध्ये राहत होते. पण हल्ली त्यांच्यात वाद व्हायचे. याच वादातून प्रियकराने चार्जरच्या वायरने गळा आवळून तिची हत्या केली व आत्महत्येचा बनाव केला. पण पोलिसांनी आरोपीच्या मुसक्या आवळल्या.



दुर्गापूर शहरात दुपारी एका हत्येची घटना ताजी असतानाच रात्री काळजाचा थरकाप उडवणारी खुनाची आणखी एक घटना उघडकीस आली. ७ वर्षांनी मोठ्या असलेल्या आपल्या प्रेयसीची मोबाइल चार्जरच्या वायरने गळा आवळून खून करून प्रेयसीने आत्महत्या केल्याचा बनाव केला. मात्र, वैद्यकीय अहवालाने त्याचा हा बनाव उघडकीस ...पान २ वर

## प्रेयसीने लग्नाचा तगादा लावला प्रियकराच्या हातून जीव गमावला

सांगली (जत) : क्राईम रिपोर्टर



सांगली जिल्ह्यातील वांगी गावात राहणाऱ्या विजय बरोबर सरिताचे लग्न झाले होते. मात्र पती दारुडा असल्याने ती त्याला सोडून माहेरी आली. माहेरी तिचे सिद्धाप्पा नावाच्या तरुणाशी सुत जुळले आणि दोघांचेही अनैतिक संबंध सुरु झाले. मात्र सरिताला विजयशी लग्न करायचे होते, पण तो दोन मुलांचा बाप असल्याने तिच्याशी लग्न करण्यास तयार नव्हता. त्यामुळे तिने त्याला ब्लॅकमेल करायला सुरुवात केली. त्यामुळे विजय चिडला आणि एके दिवशी तिला बेसावधपणे फिरायला नेवून त्याने तिची हत्या केली. तसेच तिच्या मृतदेहाची ओळख लपवण्यासाठी तिचे डोके दगडाने ठेचले. मात्र त्यांच्या प्रेमकहाणीची माहिती अनेकांना असल्याने आरोपी विजयला पोलिसांनी शिताफीने अटक केली.



जत तालुक्यातील उमदी येथील सविता हिचे लग्न गेल्या दहा वर्षापुर्वी कडेगाव तालुक्यातील वांगी येथील विजय घोडके याच्याबरोबर झाले. लग्नानंतर काही वर्षच सविता ही पतीसोबत राहिली. नंतर तिचे तिच्या नवऱ्याशी पटत नसल्याने आणि वारंवार तो तिला दारू पिऊन मारहाण करीत असल्याने ती त्याला सोडून आपल्या माहेरी निघून आली. सविता ही माहेरी राहत असताना तिचे उमदी येथील सिध्दाप्पा मदाप्पा आमागोडरू याच्यासोबत सुत जुळले. सिध्दाप्पा हा विवाहित दोन ...पान २ वर

## चिडलेला नराधम सुडाने पेटला आजी आणि नातीचा जीव घेतला



पुणे : क्राईम रिपोर्टर

आजकाल कुणाचाही भरोसा नसतो. अगदी नात्यातील माणसेही एखाद्याच्या जीवावर उठतात. आपल्या नातीला सांभाळणारी वृद्ध महिला आपल्या आणि पत्नीच्या नात्यात अडथळा ठरत असल्याच्या संशयावरून एक नराधमाने सहा वर्षांच्या चिमुरडीसह तिला सांभाळणाऱ्या ७० वर्षांच्या महिलेचाही जीव घेतला. या प्रकरणी पोलिसांनी ५ तासात आरोपीला अटक केली.

आपल्या नातीला संभाळणारी ७० वर्षीय वृद्ध महिला आपल्या आणि पत्नीच्या नात्यात अडथळा ठरत असल्याच्या संशयावरून सावत्र आजोबाने आपल्या नातीला संभाळणाऱ्या ७० वर्षीय वृद्ध महिलेसह सहा वर्षीय नातीचा निर्घृण खून केल्याची घटना आळंदी परिसरातील ठाकरवस्ती, केळगाव येथे गुरुवारी ...पान २ वर

## कर्जबाजारी भाडेकरू जीवावर उठला दागिन्यांसाठी घरमालकिणीचा जीव घेतला



सोलापूर : क्राईम रिपोर्टर

घरात भाडेकरू ठेवताना त्याची पूर्ण माहिती घ्या असे पोलिसांकडून वारंवार सांगितले जात असताना लोक लक्ष देत नाहीत. त्यामुळे घरमालकाला जीव गमवावा लागतो. बार्शीमध्ये एका महिलेने भाडेकरू ठेवला होता. पण तो शेअर बाजारात खूप पैसे हरला होता आणि कर्जबाजारी झाला होता. त्यामुळे कर्ज फेडण्यासाठी त्याने चक्क घर मालकिणीच्या दागिन्यांवर डल्ला मारण्याचा निर्णय घेतला आणि त्यातूनच त्याने घरमालकिणीची हत्या केली. या राजांनी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.



शेअर बाजारात आलेल्या नुकसानी मुळे आणि पैसे मिळवण्यासाठी एका तरुण भाडेकरूने भयंकर कांड केले आहे. वृद्ध घरमालकिणीच्या अंगावरचे दागिने लुबाडून तिचा गळा टॉवेलने आवळून खून केल्याची घटना बार्शी तालुक्यात घडली आहे. गंगुबाई कालिदास गडदे(वय ७३,राहणार,हांडे गल्ली बार्शी) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. गंगुबाई कालिदास गडदे यांचे बंधू शशिकांत किसन वायकुळे (वय ६४) यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. बार्शी पोलिसांनी चांगदेव गोवर्धन पाटील (वय ३५, राहणार हत्तीज, जि. सोलापूर) याला वृद्ध महिलेच्या खून प्रकरणी ताब्यात घेतले आहे. गंगुबाई कालिदास गडदे या बार्शीतील हांडे गल्लीमध्ये आपल्या मालकीच्या वाड्यात एकट्याच राहत होत्या. त्यांच्या वाड्यामध्ये सध्या अन्य दोन भाडेकरू चंद्रकांत सांगळे व महेश जामदारे हे राहत आहेत. भावाने अनेक दिवस कॉल ...पान २ वर

## चंचल पत्नी सुधारण्यापलीकडे गेली संतापलेल्या पतीने तिची हत्या केली

जळगाव : क्राईम रिपोर्टर



चंचल आणि व्यभिचारी बाई फार दिवस संसारात रमू शकत नाही. जळगावच्या निमखेडीमध्ये राहणाऱ्या दीपालीचे तसेच होते. ३ मुलांची आई असतानाही ती परपुरुषाबरोबर संबंध ठेवून होती. अनेक वेळा घरातून गायब होऊन ती प्रियकरासोबत राहायची. मात्र तिच्या माहेरच्या लोकांच्या विनवण्यावरून तिच्या पतीने तिला दोन तीन वेळा माफ केले. पण सासरी आल्यानंतरही तिचे बाहेरच्या लोकांशी संबंध होते. एकेदिवशी तर तिच्या पतीने तिला भररस्त्यात एका नातेवाईकाच्या सोबत बाईक वरून जाताना पकडले आणि भर रस्त्यात बेदम मारले. पण तिला काहीच फरक पडत नव्हता. याच गोष्टीवरून एकदा पती पत्नी मध्ये कडाक्याचे भांडण झाले आणि चिडलेल्या पतीने दीपालीची निर्घुण हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.





आरोपी नितीन

दिपाली आणि नितीन हे दोघे पती पत्नी होते. दोघांचा विवाहसोहळा सन २०१६ मधे संपन्न झाला होता. या विवाहाच्या माध्यमातून ठाकरे आणि सोनवणे हे दोन परिवार एकत्र आले. जळगाव तालुक्यातील कानळदा येथील ठाकरे परिवाराची कन्या दिपाली ही यावल तालुक्यातील शिरसाड येथील सोनवणे परिवारात सून म्हणून नांदण्यास आली. पुर्वाश्रमीची दिपाली ठाकरे विवाहानंतर दिपाली सोनवणे झाली. लग्नानंतर साधारण तिन वर्षानी दिपाली आणि नितीन हे दाम्पत्य जळगाव तालुक्यातील निमखेडी येथे राहण्यास आले. ...पान ६ वर

06 TO 12 APRIL 2026 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 4/5/2026 7:50 PM Page 1



पान १ वरून....

## अथर्वची स्वप्ने अर्ध्यावर सरली...

धार्मिक उत्सवांच्या गर्दीत सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटी पुन्हा एकदा समोर आल्या आहेत. गिट्टीखदान परिसरात हनुमान जन्मोत्सवानिमित्त काढण्यात आलेल्या शोभा यात्रेत सहभागी झालेला १४ वर्षीय अथर्व दिलीप नैनोरे हा अल्पवयीन मुलगा बेपत्ता झाल्यानंतर त्याचा मृतदेह अमानुष अवस्थेत सापडल्याने नागपूर शहर हादरले आहे. या घटनेमुळे उत्सवांदरम्यान नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. गुरुवारी सायंकाळी गिट्टीखदान परिसरात मोठ्या उत्साहात हनुमान जयंती निमित्त शोभायात्रा काढण्यात आली होती. सायंकाळी सात वाजता सुरू झालेली ही शोभायात्रा रात्री उशिरापर्यंत सुरू होती. परिसरातील अनेक नागरिकांसह अथर्वही या मिरवणुकीत आपल्या सहभागी झाला होता. मात्र, मिरवणूक संपल्यानंतर तो घरी परतला नाही. सुरुवातीला कुटुंबीयांनी स्वतःच्या पातळीवर शोध घेतला, पण काहीच माहिती न मिळाल्याने त्यांनी पोलिसांकडे धाव घेतली. गिट्टीखदान पोलिसांनी तक्रार नोंदवून शोध मोहीम सुरू केली. दरम्यान, नागपूर क्राइम ब्रांचच्या पथकांनाही तपासात सहभागी करण्यात आले. शहरातील विविध भागात शोध सुरू असतानाच शनिवारी दुपारी कलमेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत भरतवाडा परिसरात रिंगरोडलगत एका गोणीत अज्ञात मृतदेह आढळल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत गोणी उघडली असता त्यात एका अल्पवयीन मुलाचा मृतदेह आढळला. मृतदेहाची अवस्था अत्यंत विद्रूप होती, तसेच हात आणि पाय बांधलेल्या स्थितीत तो आढळून आले. कपडे, बूट आणि ओळखपत्राच्या आधारे हा मृतदेह अथर्व नैनोरे याचाच असल्याची खात्री पटली. या घटनेनंतर संपूर्ण शहरात संतापाची लाट उसळली आहे. पोलीस आयुक्त रविंद्र सिंगल यांनी स्वतः घटनास्थळी भेट देत तपासाचा आढावा घेतला. मृतदेह शवविच्छेदनासाठी मेयो रुग्णालयात पाठविण्यात आला असून, या हत्येमागील कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. दरम्यान, धार्मिक आणि सार्वजनिक कार्यक्रमांदरम्यान अल्पवयीन मुलांच्या सुरक्षेबाबत प्रशासन किती सजग आहे, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असताना पुरेशी देखरेख, सीसीटीव्ही व्यवस्था आणि पोलीस बंदोबस्त का नव्हता? असा सवाल नागरिकांकडून केला जात आहे. या प्रकरणाचा तपास वेगाने सुरू असून, आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथके नियुक्त करण्यात आली आहेत.

## जमिनीच्या तुकड्यासाठी बाप आणि...

आहे. आपल्या आई वडिलांचा ओढा हा धाकटया भावाकडे असल्याने त्यांनी आपल्या हिश्याची वाटणी त्याला दिलेली आहे. म्हणून तो रोज दारू पिऊन घराकडे आला की या कारणातून त्याच्याबरोबर भांडण काढत त्यांना शिवीगाळ करीत होता. कधी कधी दारूच्या नशेत संभाजी हा वडिलांना मारहाण ही करीत असल्याने वडिलांनी आणि धाकटया भावाने मिळून हातकणंगले पोलीसात संभाजी याच्या विरोधात तक्रार दाखल केली होती. त्यामुळे तो जास्तच या दोघांच्यावर चिडून होता. दोघांना ही तो बघुन घेण्याची भाषा करीत होता. त्यातच घरच्या भांडणात बायकांनी तोंड घातले असल्याने वाद हा जास्तच चिघळला होता. वडिल मारूती कुंडले हे संभाजी याला तु आणि तुझी बायको आम्हा नवरा बायकोला बघत नाहीसा त्यामुळे आमच्या हिश्याची वाटणी तुला का द्यावी असे म्हणत होते. ही भांडणे जास्तच टोकाला गेल्यावर पै-पाहुण्यांनी हा वाद मिटविण्याचा प्रयत्न केला. परंतु संभाजी हा त्या २० गुंठेसाठी आडून बसला असल्याने वाद काही केल्या मिटत नव्हता. गावाच्या पुढाऱ्यांनी आणि पंचानी देखील संभाजी याला समजावून सांगितले, परंतु त्याचेत काही फरक पडला नाही. उलट दिवसे दिवस वाद उकरून काढून दोघांना ही मारून टाकण्याची भाषा करीत होता. मागे एकदा भांडणात त्याने वडिल मारूती कुंडले याच्या डोक्यात लोंखडी पारा घालुन त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यावेळी शेजाऱ्यांनी दाखविलेल्या सर्तकतेने मारूती कुंडले हे वाचले होते. आता तर संभाजी हा वडिलांच्यावर आणि धाकट्या भावावर डुख धरूनच होता. या दोघांना कधी संपवितो असे त्याला झाले होते. त्यातच संभाजीची बायको सासु सासऱ्यांना आणि जावेला अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करीत त्यांना आमचा तळतळाट लागेल असे म्हणत आपले हात मोडत त्यांना शापच देत होती.

मारूती कुंडले हे काही झाले तरी आपल्या नवरा बायकोच्या असलेली २० गुंठे शेत हे मोठा मुलगा संभाजी याला द्यायला तयार नव्हते. भांडणात ते संभाजीला तु पार बघिडलेला आहेस, तु दारूच्या व्यसनाच्या आहरी गेलेला आहेस त्यामुळे आम्ही दोघे नवरा बायको जिंवत असे पर्यत तुला आमच्या हिश्यातील वाटणी काही केल्या मिळणार नाही.तुला जे रितसर वाटणीला आलेले आहे ते घर आणि शेत ते आम्ही तुला दिलेले आहे. आम्ही जिंवत असे पर्यत नवरा बायको ती २० गुंठे शेतजमीन आम्ही दोघांच्या पैकी कोणाच्या ही नावे करणार नाही. आम्ही मेल्यानंतर त्या शेतजमीनीचा हिस्सा तुमच्या दोघात करून घ्या. वडिल असे म्हणत असले तरी आई आणि वडिल ती २० गुंठे शेतजमीन हे धाकटा भाऊ शीतल याच्या नावावरच करतील अशी शंका आणि भीती त्याला होती. त्यामुळे तो काही त्याचे ऐकायला तयार नव्हता. सधन कुटूंबात शेत जमीन घर असून देखील त्यावरून भांडणे होत असतात. ती भांडणे पुढे इतकी विकोपाला जातात की, त्यातून रक्ताचे पाट देखील वाहतात. परंतु हा वाद ही भांडणे काही केल्या मिटत नाही ही एक शोकांकिकाच म्हणावी लागेल. अगदी तसेच कुंडले कुटूंबात झाले होते. सगळे काही असून कुटूंबात शांतता नव्हती. रोज भांडणे मारामाऱ्या होत होत्या. याचा कधी भडका होईल हे काही सांगता येत नव्हते. संभाजीचा स्वभाव हा रागीट आणि भांडखोर होता. तो भांडणात कधी काय करेल याची शाश्वती नव्हती. तो २० गुंठेसाठी हट्टालाच पेटलेला होता. तुमच्या दोघांचा मुडदा पाडतो परंत ती २० गुंठे शेत मी घेतल्या शिवाय राहत नाही असे तो त्या दोघांना ही धमकावित होता. तो त्या दोघांना संपविण्याचा प्लॅन करीत तशी संधी शोधत होता.

रविवार दिनांक २९ मार्च २०२६ रोजी दुपारी ३ वाजणेच्या सुमारास वडिल मारूती आणि भाऊ शीतल हे दोघे शेतात विहिरीच्या मागे काम करीत होते. त्याचे शेत हे कुंभोज आणि हिंगणगाव रस्त्याला असल्याने दुपारच्या सुमारास रस्त्याला गर्दी ही तुरळक होती. रस्त्यापासून विहिर ही थोडी लांब असल्याने आडोशाला काय चालले आहे हे सहसा कोणाला काही कळत नव्हते. दुपारच्या सुमारास मारूती आणि त्याचा धाकटया मुलगा शीतल हे दोघे शेतात खाली मान घालून काम करीत असल्याने तेथे दारूच्या नशेत संभाजी आला. दारूच्या नशेतच त्याने मारूती यांना बाबा, तुम्ही या २० गुंठ्याचे काय करणार आहात असा प्रश्न विचारला. तो दारूच्या नशेत आहे हे मारूती यांनी ओळखले. त्याला तुला आता कशाला हा वाद पाहिजे झाला आहे. मी तुला कितीदा सांगितले की, आम्ही नवरा बायको दोघे जिंवत असे पर्यंत २० गुंठे रान खाणार आहोत. उरलेले रान दोघात सम समान केले आहे उगाच वाद घालू नकोस, इथून नीट जा. यावर संभाजी हा धाकटा भाऊ शीतल याच्याकडे बघत तुच आई वडिलांना शिकवतो आहेस, तुला २० गुंठे पाहिजे म्हणुन तु त्यांना तुझ्या जवळ ठेवून घेतले आहेस. पण मी तुला एकट्याला २० गुंठे खाऊ देणार नाही असे म्हणत तो त्याच्या अंगावर धावून गेला. शेतात दोघात हाणामारी सुरू झाली.

दोघांची भांडणे होत असताना मारूती यांनी मध्ये पडत दोघांची भांडणे सोडवित संभाजी याला बाजुला करीत त्याच्या कानपटीत जोरात लगावली. त्यासरशी संभाजी हा रागाने लालबुंद झाला. त्याने बाजुलाच पडलेली कुऱ्हाड घेतली. त्या कुऱ्हाडीने त्याने वडिलांच्या डोक्यात जोरात वार केला. त्यासरशी मारूती कुंडले याच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्ताची धार लागली. त्याचे डोके फुटले. ते जमीनीवरच कोसळले. हे बघुन शीतल याने बाजुलाच पडलेली लोखडी खोरे घालण्याचा प्रयत्न केला. परंतु संभाजी याने त्याच्या हातातून ते खोरे काढून घेत त्याच खोऱ्याने शीतलच्या डोक्यात वार केला. त्या वारात शीतल याचे ही डोके फुटले. तो ही रक्ताच्या थारोळ्यात पडला. संभाजी एवढयावरच थांबला नाही.त्याने कुऱ्हाडीने परत शीतलवर वार केला. या वारात शीतल याचा जागीच मृत्यु झाला. वडिल आणि भावाचा आपण केलेल्या मारहाणीत मृत्यु झाल्याचे बघुन संभाजी हा जागीच डोक्याला हात लावून बसला. घरी जावून त्याने या घटनेची माहिती आपल्या पत्नीला दिली. ती आरडा ओरडा करीत घटनास्थळी आली. तिच्या ओरडण्याने आजुबाजुचे लोक ही घटनास्थळी धावत आले. घटनास्थळी रक्ताच्या थारोळ्यात मारूती कुंडले आणि शीतल कुंडले याचे मृतदेह पडले होते. बाजुलाच रक्ताने माखलेली कुऱ्हाड आणि लोंखडे खोरे ही होते. ही घटना पाहणाऱ्याचा अंगाचा थरकाप उडविणारी होती. जो तो या घटनेने हळहळत होता. जीवाचा थरकाप उडविणारी ही घटना अंगावर शहारे ही आणत होती. घटनास्थळी बाया माणसांचा रडण्याने वातावरण अगदी गंभीर झाले होते. इकडे या घटनेनंतर संभाजी कुंडले हा रात्री उशिरा स्वतःहून हातकणंगले पोलीसात हजर झाला. त्याने घडलेली सगळी हकीकत पोलीसांना सांगितली. त्याला घेऊन पोलीसांनी हिंगणगाव येथील घटनास्थळ गाठले. घटनास्थळी वरिष्ट पोलीस अधिकारी डी.वाय.एस.पी. अमोल ठाकूर यांनी भेट देवून या घटनेची पाहणी केली. त्यांनी पोलीसांना तपासाच्या योग्य त्या सुचना दिल्या.

हातकणंगले पोलिसांनी स.पो.निरी. यादव मॅडम याच्या मार्गदर्शनाखाली या घटनेचा पंचनामा करून दोन्ही मृतदेह हातकणंगले ग्रामीण रुग्णालयात पाठवून दिले. पोलीसांनी संशयीत संभाजी कुंडले याला हातकणंगले पोलीसात आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता त्याने आपला गुन्हा कबुल करीत तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसाना दिली. या घटनेची लेखी फिर्याद हातकणंगले पोलीसात मयत मारूती कुंडले याच्या जवळच्या नातेवाईकाकडून घेण्यात आली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी मारूती बंडु कुंडले (वय ६७) रा.हिंगणगाव तालुका हातकणंले आणि शीतल मारूती कुंडले (वय ४३) रा.हिंगणगाव तालुका हातकणंले याच्या खुन प्रकरणी संभाजी मारूती कुंडले (वय ४६) रा.हिंगणगाव तालुका हातकणंगले याच्या विरोधात भा.दं.वी. कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल केला. हातकणंगले पोलिसांनी त्याला कोर्टात हजर केले असता मा.कोर्टाने त्याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.या दरम्यान पोलीसांनी घटनास्थळावरून गुन्हयात वापरलेली कुऱ्हाड आणि लोखंडी खोरे जप्त केले. या घटनेचा पुढील तपास स.पो.नी यादव मॅडम करीत आहेत. शेतजमीनीच्या वाटणीसाठी रक्ताची नाती विसरून कुणी ही किती ही खालच्या थराला जात असतो याची प्रचिती या दुहेरी घटनेने येते.

## चारित्र्याच्या संशयाचा भयंकर शेवट...

वजेश्वरी ते शिरसाड रस्त्यावरील शिरवली गावच्या हद्दीत एका शेतातील जांभळाच्या झाडाखाली २५ ते ३० वयोगटातील एका महिलेचा मृतदेह कुजलेल्या स्थितीत आढळून आला होता. शवविच्छेदन अहवालात या महिलेची गळा चिरून आणि डोक्यावर प्रहार करून हत्या करण्यात आल्याचे स्पष्ट झाले. याप्रकरणी मांडवी पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. मृतदेह पूर्णपणे कुजलेला असल्याने मृतदेहाची ओळख पटवणे पोलिसांसमोर मोठे आव्हान होते. या प्रकरणाचा तपास विरार गुन्हे शाखा कक्ष ३ च्या पथकाकडे सोपविण्यात आला होता. घटनांस्थळी मिळालेल्या माहिती व सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे रोशन आणि भानुप्रताप या दोघांना नालासोपारा येथून ताब्यात घेऊन चौकशी केली असता गुन्ह्याची कबुली दिली आहे. आरोपी रोशनला आपल्या पत्नीच्या चारित्र्यावर संशय होता. याच रागातून त्याने तिचा काटा काढण्याचे ठरवले. त्याने पत्नीला १५ मार्च रोजी उत्तर प्रदेशातून नालासोपारा येथे आणले. त्यानंतर मित्र भानुप्रतापच्या मदतीने खुनाचा कट रचला. १९ मार्च रोजी आरोपींनी प्रिया कुमारी हिला दुचाकीवरून निर्जन अशा शिरवली परिसरात नेले. तिथे तिच्या मानेवर धारदार चाकूने वार करून आणि डोके दगडाने ठेचून तिची हत्या केली व मृतदेह गवतात फेकून दिला असल्याची माहिती पोलीस उपायुक्त (गुन्हे) संदीप डोईफोडे यांनी सांगितले आहे. ही कारवाई पोलीस उपायुक्त ( गुन्हे) संदीप डोईफोडे, सहायक पोलीस आयुक्त मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखालीपोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, सहायक पोलीस निरीक्षक सुहास कांबळे, शिवाजी पाटील, मुकेश तटकरे, गोविंद केंद्रे, सागर बारावकर, प्रशांत पाटील, राकेश पवार, सुनील पाटील व त्यांच्या पथकाने केली आहे.

## 'लिव्ह इन' मधला संपला लळा...

आला. शेवटी पोलिसांनी आरोपीस बेड्या ठोकल्या. अंकेश योगेश बहीरवार (२२, रा. सोनापूर, ता. सावली) असे आरोपी प्रियकराचे नाव असून, प्रियंका वांढरे (वय २९, रा. तुकूम) असे मृत प्रेयसीचे नाव आहे.

प्रियंका पतीपासून विभक्त राहत होती. याचदरम्यान तिची ओळख ७ वर्षांनी लहान असलेल्या अंकेशशी झाली. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले आणि दोघेही प्रियंकाच्या घरीच वरच्या मजल्यावर लिव्ह-इनमध्ये राहू लागले. मात्र, गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यात क्षुल्लक कारणावरून वाद होत होते. १४ मार्च २०२६ च्या रात्री अंकेशने प्रियंकाच्या वडिलांना फोन करून प्रियंका बोलत नाहीये, तिने मान टाकली आहे असे सांगून घाबरविण्याचा प्रयत्न केला. गुरुवारी आलेल्या शवविच्छेदन अहवालाने चित्र पालटले. प्रियंकाचा मृत्यू गळा आवळल्याने झाल्याचे स्पष्ट होताच पोलिसांनी अंकेशला ताब्यात घेतले.

## प्रेयसीने लग्नाचा तगादा लावला...

मुलांचा बाप होता. तरी ती त्याला चिकटली होती. नवऱ्यापासून वेगळे राहणाऱ्या जवान बाईला काय लागते हे सिध्दाप्पाने चांगले ओळखले होते. तो तिची प्रत्येक गरज पुर्ण करीत होता. तिला लागेल त्यावेळी पैसे देत होता. त्यामुळे सविता ही त्याला आपल्या नागडया अंगावर खेळवित होती. तो ही पैसे देवून तिची चमडी लोळवित होता. त्यातून त्याचे अनैतिक संबंध जुळले होते. तो तिला बाहेर गावी नेऊन ही उपभोगत होता. त्या दोघांना कुणी पाहिले तर ते दोघे नवरा बायको असल्यासारखे बघणाऱ्याला वाटत होते. त्यामुळे कोणाला त्याच्या संबंधा विषयी शंका येत नव्हती. सविता ही त्याला पाहिजे तसे सुख देत असल्याने सिध्दाप्पा ही तिच्यावर तुटून पडत होता. तिची कमसीन जवानी भोगून तो ही मजा मारत असल्याचे तिच्या लक्षात आल्यावर ती हल्ली त्याच्या मागे लग्नाचा तगादा लावू लागली होती. परंतु तो तिच्याशी लग्न करायला तयार नव्हता. कारण त्याला तिच्यापेक्षा आपली बायको मुले प्यारी होते. त्यामुळे तो तिच्याशी लग्न करण्याचे टाळत होता. तिला तो कोणते ना कोणते कारण सांगून टाळत होता. हल्ली त्या दोघात या कारणातून भांडण होत होते. परंतु तो तिची समजुत काढून तिला मी वेळ आल्यावर तुझ्याशी लग्न करेन असे सांगून तिची समजुत काढत होता. तिला नवरा म्हणून त्याचा आधार हवा होता. परंतु तो तिचा फक्त त्या कारणासाठी वापर करीत तिची दिशाभुल करीत होता. नेमकी ही गोष्ट सविताच्या लक्षात आल्याने ती त्याच्याशी भांडण काढून त्याला त्याचा जीव नकोसा करू लागली होती. तु जर माझ्याशी लग्न केले नाहीस तर मी एक तर तुझ्या विषयी पोलीसात तक्रार तर दाखल करेन किंवा आत्महत्या तरी करेन तुझ्या नावाने चिठ्ठी लिहून मी आत्महत्या करेन अशी तिने त्याला धमकी दिल्यावर तो घाबरला होता. तो तिला मी तुझ्याशी नक्की लग्न करेन असे सांगून तिला गप्प करीत होता. बरेच दिवस तिने त्याची वाट पाहिली. परंतु तो काही लग्न करीत नाही ही गोष्ट तिच्या लक्षात आल्यावर तिने त्याला तु जर माझ्याशी लग्न केले नाहीस तर मी तुझ्या घरात येवून बसेन तुझ्या बायको पोरांना तुझे सगळे करतुत सांगेन अशी ही धमकी तिने त्याला दिली. तिच्या या धमकीने तो चांगलाच धास्तावला होता. त्याला काय करावे आणि काय नको असा झाले होते. तो विचार करीत होता. ती सांगून ही आणि पैसे देवून ही ऐकणार नाही हे त्याने ओळखले. ती जर आपल्या घरी येवून बसली तर आपल्या संसाराची राख रांगोळी होईल याची भिती त्याला वाटू लागली होती. त्याने यावर एक निर्णय घेतला. हिलाच जर आपल्या मार्गातून हटवले तर कुणाला काही समजणार नाही आणि आपल्या मागची पिडा ही सुटेल असे त्याला वाटले. त्याने तिला संपविण्याचा निर्णय घेतला.

दिनांक २८ मार्च २०२६ रोजी त्याने तिला फोन करून उमदीहून जतला बोलावून घेतले. ती दुपारच्या सुमारास जत बस स्टॅन्डवर आली. तिच्या अंगावर पंजाबी ड्रेस होता. गळ्यात ओढणी होती. बस स्टॅन्ड बाहेर तो तिची वाट पाहत थांबला होता. जत येथे आल्यावर तिने त्याला फोन केला. फोनवर सिध्दाप्पाने तीला जत बस स्टॅन्डच्या बाहेर येण्यास सांगितले. ती बाहेर आल्यावर ती त्याच्या दुचाकी गाडी वर बसली. ते दोघे ही निवांत गप्पा मारत अमृतवाडी परिसरात गेले. दिवस बुडत चालला होता त्याने तिला एका ओसाड शेतात नेले. ते दोघे ही एका झाडाच्या आडोशला जावून ते सुख घेत होते. तो तिच्यावर पडून मनसोक्तते सुख घेत होता. ती ही त्याला ते सुख देत होती. त्याचे ते काम झाल्यावर तिने त्याला विचारले आपण लग्न कधी करायचे यावर त्याला तिचा राग आला. ती लग्नाचे काय घेऊन बसली आहेस. मी तुला पैसे देतो नव्हे म्हणत त्याने आपल्या पाकिटातून पाचशेच्या चार नोटा काढल्या आणि तिच्या तोंडावर फेकल्या.ती त्याला चिडून म्हणाली. मी काय धंदे वाली बाई आहे का?मला पैशाची मिजाश दाखवितोस यावर दोघांत तु तु मै मै सुरू झाले. तो तिला लाथाबुक्यांनी तुडवून मारू लागला. साली तु तुझ्या नवऱ्याची झाली नाहीस त्याला दगा देवून आली आहेस आणि माझ्याशी काय तु नीट राहणार म्हणत तो तिला मारहाण करीत तिच्या छाताडावर बसला. ती त्याला अर्वाच्च भाषेत शिव्या देत होती. त्याला तिचा भयंकर राग आल्याने त्याने रागाच्या भरात तिच्याच ओढणीने तिचा गळा जोरात आवळून धरला. ती मला सोड म्हणत होती. पण तो काही तिला सोडत नव्हता. त्याने तिचा ओढणीने गळा जोरात आवळ्याने तिची हलचाल काही क्षणात मंदावली. तिचा श्वसो श्वास थांबला. तिचा आपल्या हातून खुन झाला आहे हे त्याच्या लक्षात आल्यावर पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने त्याने बाजुलाच पडलेला मोठा दगड उचलला आणि तिच्या डोक्यात घातला. तिचे डोके फुटले. डोक्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला. एवढे करून कुणाला काही शंका येणार नाही आणि आजुबाजुला कुणी नाही हे पाहून त्याने आपली गाडी घेऊन तेथून पळ काढला. दिनांक ३० मार्च रोजी तेथून जाणाऱ्या एका इसमाला झाडाच्या आडोशाला एका महिलेचा रक्ताच्या थारोळ्यता पडलेला मृतदेह दिसला. त्याने या घटनेची माहिती जत पोलीसांना दिली.

या घटनेची माहिती मिळताच जत पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनेचा पंचनामा करून मयत महिलेची ओळख पटविण्याचा प्रयत्न केला.मयत महिलेच्या बाजुला रक्ताने माखलेला दगड पडला होता. तर तिच्या गळ्याभोवती ओढणी दिसत होती. त्या ओढणीने तिचा गळा ही आवळ्याचे दिसत होते. प्रथमता पोलीसांनी मयत महिलेच्या पर्सची झाडा झाडती घेतली असता तिच्या कडील आधार कार्डवरून तिची ओळख पटविण्यात आले. ती महिला कडेगाव तालुक्यातील वांगी येथील सविता विजय घोडके ही असल्याचे निष्पन्न झाले. सविता ही उमदी येथे राहत असून तिचे उमदी येथीलच सिध्दाप्पा महादाप्पा आमगोडरू बरोबर विवाह बाहय संबंध असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. पोलीसांनी घटनेचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी जत येथील ग्रामीण रुग्णालयात पाठवून दिला. पोलीसांना मिळालेल्या माहिती नुसार पोलीसांनी उमदी येथून सिध्दाप्पा आमगोडरू याला ताब्यात घेतले. त्याला जत पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची पोलीस चौकशी करीत असताना तो पोलीसांना उडवा उडवीचे उत्तर देत होता. पोलीसांनी त्याला खाकीचा प्रसाद दिल्यावर त्याने मयत सविता हिचे आपल्या सोबत विवाह बाहय संबंध असल्याचे मान्य केले. मयत सविता ही लग्नाचा तगादा लावीत होती. लग्न केले नाही तर मी आत्महत्या करेन अशी धमकी तिने दिल्याने चिडून आपण तिचा कायमचा काटा काढल्याचे त्याने पोलीसांना सांगितले. त्याने आपला गुन्हा कबुल केल्यावर पोलीसांनी या घटनेची फिर्याद मयत सविता घोडके हिच्या माहेरच्या नातेवाईकाडून घेण्यात आली. त्यांनी दिलेल्या माहितीवरून पोलीसांनी सविता विजय घोडके (वय ३२) रा.वांगी तालुका कडेगाव सध्या उमदी जत हिच्या खुन प्रकरणी तिचा प्रियकर सिध्दाप्पा महादाप्पा आमगोडरू (वय ३५) रा.उमदी तालुका जत याच्या विरोधात भा.दं.वी. कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल केला. पोलीसांनी त्याला जत येथील प्रथमवर्ग न्यायालयासमोर उभे केले असता मा.न्यायालयाने त्याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान त्याच्याकडुन गुन्हयात वापरलेली दुचाकी गाडी दगड आणि ओढणी जप्त केली. या घटनेचा पुढील तपास जत पोलीस करीत आहेत. विवाहबाहय संबंधात गरज बघून पुरूष जवळ येत असल्याने त्याची गरज संपली की तो तिच्यापासून बाजुला होऊ इच्छितो येथेच त्याच्यात भांडणे सुरू होतात. ती त्याच्या मागे लग्नाचा तगादा लावते, परंतु त्याची गरज संपली असल्याने त्याला आपली बायको मुले प्यारी वाटतात. दोघातील वाद विवाद इतका टोकाला जातो की यातून मग खुनासारखी अघटित घटना घडते हेच या घटनेवरून दिसून येते.

## चिडलेला नराधम सुडाने पेटला...

(दोन एप्रिल) सकाळी उघडकीस आली. पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपी असणाऱ्या सावत्र आजोबाला आळेफाटा (ता. जुन्नर) येथून अटक केली असून, त्याने गुन्ह्याची कबुली दिली आहे.मंगल शिंदे (वय ७०) आणि धनश्री केदारी (वय सहा) अशी खून झालेल्यांची नावे आहेत. या प्रकरणी संगीता दत्तात्रय केदारी (वय ४१) यांनी आळंदी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार विनायक तुकाराम भवारी (वय ३१) याला अटक करण्यात आली आहे. आरोपी भवारी हा फिर्यादी केदारी यांचा दुसरा पती आहे.आळंदी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक भीमा नरके यांनी दिलेल्या माहितीनुसार, संगीता केदारी यांच्या पहिल्या पतीचे आणि मुलाचे निधन झाले आहे. पाच वर्षापूर्वी मुलाचे निधन झाल्यानंतर त्यांची सून घरातून निघून गेली. सुनेने जाताना आपली मुलगी धनश्रीला बरोबर नेले नाही. त्यामुळे धनश्रीचा सांभाळ तिची आजी संगीता करीत होत्या. त्या एका हॉस्पिटलमध्ये हाउसकीपिंगचे काम करीत होत्या.बुधवारी (एक एप्रिल) रात्री त्या धनश्रीला शेजारी राहणाऱ्या मंगल शिंदे यांच्याकडे सोडून कामावर गेल्या. मंगल शिंदे एकट्याच राहत होत्या. रात्री मंगल शिंदे आणि धनश्री झोपेत असताना भवारी याने शिंदे यांच्या डोक्यात दगड घालून खून केला. तेवढ्यात धनश्रीला जाग आली. त्यामुळे आरोपीने धनश्रीचा गळा आवळून तिचा खून केला. गुरुवारी सकाळी संगीता केदारी आपल्या नातीला घरी घेऊन जाण्यासाठी शिंदे यांच्या घरात गेल्या असता घरात त्यांना दोघी मृतावस्थेत पडल्याचे दिसले. घराचा पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण करून आरोपी विनायक भवारी याला आळेफाटा येथून ताब्यात घेतले. त्याने या गुन्ह्याची कबुली दिली आहे.

## कर्जबाजारी भाडेकरू जीवावर उठला...

करण्याचा प्रयत्न केला पण काही उत्तर मिळाले नाही. त्यामुळे तो २७ मार्च रोजी वाड्यावर पाहण्यासाठी गेला असता, २५ मार्चला गंगुबाई घराला कुलूप लावून निघून गेल्याची माहिती मिळाली. त्या नंतर परतल्याच नाहीत असे भाडेकरूंनी सांगितले. त्यानंतर वायकुळे यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यामध्ये आपली बहीण बेपत्ता असल्याची तक्रार दिली. आजूबाजूला विचारपूस केल्यानंतर २५ तारखेला गंगुबाईंचा जुना भाडेकरू चांगदेव गोवर्धन पाटील (वय ३५ वर्षे राहणार हत्तीज) हा आला होता, अशी माहिती मिळाली. त्याला चौकशीसाठी बोलावले असता तो कारणं देऊन गैरहजर राहीला. त्यानंतर बार्शी पोलिसांनी सीसीटीव्हीच्या सहाय्याने तपास सुरू केला. यावेळी मेडिकलच्या फुटेजमध्ये गंगुबाई पिवळ्या रंगाची साडी नेसून जात असताना दिसल्या. त्यावेळी चांगदेव त्यांच्या पाठलाग करताना दिसला. त्यानंतर बराच काळ प्रयत्न करत चांगदेव पाटील याला पोलिस ठाण्यात हजर करण्यात आले. पोलिसांनी वायकुळेंसमक्ष चांगदेव पाटीलची गंगुबाई यांच्याबाबत विचारपूस केली. चांगदेवप खाक्या दाखवताच पोपटासारखा बोलू लागला. चांगदेव पाटीलचे शेअर मार्केटमध्ये मोठे आर्थिक नुकसान झाले होते. त्याला पैशाची गरज होती. तसेच गंगुबाई यांच्या हातात सोन्याच्या पाटल्या, गळ्यात डोरले, सोन्याचे वेल व फुले असल्याचे पाहुन चांगदेवच्या मनात खोट निर्माण झाले. सोने मिळवून त्यातून आर्थिक अडचण भागवण्याच्या उद्देशाने चांगदेवने २५ मार्च रोजी दुपारी बारा ते दीडच्या दरम्यान गंगुबाई कालिदास गडदे हिला चांगदेव याचे राहते घरी बोलवले. त्यांना लिंबू सरबतमधून झोपेच्या गोळ्या दिल्या. त्या बेशुद्ध झाल्यावर त्यांच्या नाकाला टॉवेलने दाबून त्यांचा खून केल्याचे कबुल केले. वृद्ध गंगुबाई गडदे या मेल्याची खात्री झाल्यावर त्याांचा मृतदेह घरातील काळपट रंगाच्या पोत्यात भरून दुपारी चांगदेव याने हुंडाई कारने डिकीमध्ये नेऊन मृतदेहाची विल्हेवाट लावल्याची कबुली पोलिसांसमोर दिली. त्यामुळे वायकोळे यांच्या फिर्यादीनुसार बार्शी शहर पोलीस स्टेशनमध्ये आरोपी चांगदेव गोवर्धन पाटील यांच्या विरोधात वृद्धे गंगुबाईचा खून केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक उमाकांत कुंजीर करत आहेत.

# जगतज्योती महात्मा बसवेश्वर जयंती समितीच्या अध्यक्षपदी मुक्तेश्वर मिटकरी यांची निवड

**औसा : वार्ताहर**

औसा येथील वीरशैव लिंगायत समाजाचे अध्यक्ष सुभाषप्पा मुक्ता यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या बैठकीत जगतज्योती महात्मा बसवेश्वर जयंती समितीच्या अध्यक्षपदी येथील युवा कार्यकर्ते मुक्तेश्वर चंद्रकांत मिटकरी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. तर उपाध्यक्षपदी स्वप्निल शंकर स्वामी, ओमकार बाडगीरे यांची निवड करण्यात आली. जगतज्योती महात्मा बसवेश्वर जयंती समितीच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यासाठी येथील महादेव मंदिर येथे नुकतीच बैठक घेण्यात आली. या बैठकीस समाजातील अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. या बैठकीत जगतज्योती महात्मा बसवेश्वर जयंती समितीच्या इतर पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली त्यात सचिवपदी सिद्धांत संतोष इळेकर, सहसचिव ओमकार चंदणप्पाा उटगे, कोषाध्यक्ष संगमेश्वर संतोष औसेकर, सहकोषाध्यक्ष गौरीशंकर बिराजदार, प्रसिद्धी प्रमुख सागर कल्याणी, गितेश कल्याणी, वेदांत स्वामी, गणेश बोधणे, सजावट प्रमुख आशुतोष खोत, आलोक स्वामी, ओमकार नागराळे, मिरवणूक प्रमुख गौरेश स्वामी, रितेश मुर्गे, यश कटके, योगेश मिटकरी कार्याध्यक्ष नितीश तिळगूळे, कल्याण मिटकरी सदस्य आणि सल्लागार म्हणून वीरशैव लिंगायत समाजाचे पदाधिकारी राहणार आहेत. या बैठकीस विरशैव लिंगायत समाजाचे सचिव अमर उपासे उपाध्यक्ष वैजनाथ शिंदूरे, सोमशेखर स्वामी, सिद्धेश्वर गवळी, योगेश शेटकार, केदार निगुडगे, ओंकार नागराळे यांच्यासह अनेक समाज बांधव उपस्थित होते.

06 TO 12 APRIL 2026 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 4/5/2026 7:50 PM Page 1



# महापालिका विरोधी पक्षनेते देविदास काळे यांनी घेतला शहर स्वच्छतेचा आढावा

**लातूर : वार्ताहर**




स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत स्वच्छता मोहिमेसाठी लातूर महानगरपालिकेस देशपातळीवरचे बक्षीस मिळालेले होते. मात्र आता स्वच्छता विभागाकडून शहर स्वच्छतेला गती मिळत नसल्याच्या अनेक तक्रारी होत आहेत. ही बाब लक्षात घेऊन स्वच्छता विभागाने नगरसेवकांशी समन्वय साधून प्रभागातील स्वच्छता मोहिमेला गती द्यावी अशी सुचना करून यासाठी राबविण्यात येणाऱ्या मोहिमेचा अहवाल तात्काळ देण्यात यावा असे निर्देश मनपा विरोधी पक्षनेते देविदास काळे यांनी दिले आहेत. महानगरपालिकेतील दालनात मनपा विरोधी पक्षनेते देविदास काळे यांनी स्वच्छता निरीक्षकांची बैठक घेऊन शहर स्वच्छतेचा आढावा घेतला. यावेळी उपायुक्त वसुधा फड, स्वच्छता प्रमुख रमाकांत पिडगे यांच्यासह प्रत्येक प्रभागातील स्वच्छता निरीक्षक उपस्थित होते. दरवर्षी महानगरपालिकेच्या वतीने मान्सुनपुर्व स्वच्छता मोहिम राबविण्यात येते. याहीवर्षी ही मोहिम वेळेत सुरु करावी असे सांगून शहरातील ज्या-ज्या भागामध्ये पावसामुळे नाल्या तुंबणे किंवा रस्त्यावर पाणी येऊन दुर्गंधी पसरणे या बाबी ज्या ठिकाणी होतात त्या ठिकाणची नाले सफाई शास्त्रोक्त पद्धतीने करण्यात यावी अशी सुचना करून ज्या ठिकाणी बांधकाम विभागाची गरज आहे त्या ठिकाणी त्यांच्याशी समन्वय साधून नाल्या तुंबू नये यासाठी आवश्यक असणारी काय कार्यवाही करावी लागते आणि त्यासाठी किती निधी अपेक्षीत आहे याबाबतचाही अहवाल स्वच्छता विभागाने आगामी आठ दिवसात द्यावा अशी सुचना देविदास काळे यांनी केली.

लातूर महानगरपालिकेने मागील काळात स्वच्छतेचे चांगले काम करून देशपातळीवरचे पारितोषक मिळविले होते, याची आठवण करून देत देविदास काळे यांनी पुन्हा एकदा अशाच पद्धतीचे काम मनपाच्या स्वच्छता विभागाकडून होणे अपेक्षीत असल्याचे सांगितले. शहरातील प्रत्येक प्रभागात असलेल्या प्रत्येक घरापर्यंत घंटागाडी पोहचावी अशी सुचना करुन घंटागाडीवर असणार्या चालकाचे व कर्मचार्यांचे संपर्क क्रमाक नागरीकांपर्यंत पोहचविण्यासाठी आवश्यक असणारी कार्यवाही तात्काळ करण्यात यावी असे सांगितले. प्रभाग निहाय स्वच्छता मोहिमेचा ॲक्शन प्लॅन तयार करुन आगामी कांही दिवसात प्रत्येक प्रभागात ही मोहिम राबविण्यात यावी असे सांगून सदर मोहिम सुरु करण्यापुर्वी नगरसेवकांशी समन्वय साधून त्यांच्याही सुचनाचा या मोहिमीत समावेश करुन घ्यावा असे सुचीत केले.

स्वच्छतेबाबत आलेल्या नागरीकांच्या तक्रारी सोडविण्यासाठी तात्काळ प्राधान्य द्यावे असे सांगून स्वच्छता विभागाचे काम अधिक गतीने होण्यासाठी सर्वांनीच प्रयत्न करावेत जेणे करून पुन्हा एकदा लातूर महानगरपालिकेला स्वच्छतेबाबत देशपातळीवरचे पारितोषक मिळेल असा विश्वास मनपा विरोधी पक्षनेते देविदास काळे यांनी व्यक्त केला. यावेळी उपायुक्त वसुधा फड यांच्यासह स्वच्छता निरीक्षकांनी सांगितलेल्या अडचणी सोडविण्यासाठी शासन व प्रशासन दरबारी पाठपुरावा करू अशी ग्वाही देविदास काळे यांनी दिली.

# देवणीत नगराध्यक्षाच्या प्रभागातच सिमेंट रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे!

**देवणी : वार्ताहर**



देवणी शहरातील नगरपंचायत अंतर्गत मनोहर लुले यांच्या घरापासून ते आजिज तांबोळी यांच्या घरापर्यत प्रभाग क्रमांक १५ मध्ये होत असलेल्या सिमेंट काँक्रेट चे काम अत्यंत बोगस व निकृष्ट दर्जाचे होत असून जागोजागी काळी माती दिसत असून व तसेच काही ठिकाणी मोठमोठाले दगड उघडे पडले आहेत त्यावर कसल्याच प्रकारची पीसीसी न करता सिमेंट काँक्रेटचे बोगस काम चालू असल्यामुळे प्रभागातील काही नागरिकांनी नगराध्यक्ष डॉक्टर संजय घोरपडे यांना बोलावून सदरील होत असलेले निकृष्ट दर्जाचे काम तात्काळ थांबवण्याची मागणी केली आहे पीसीसी झालेल्या काही ठिकाणी वाहन जाताच रस्ता दीड दीड दोन दोन फूट खोल दबला गेला आहे आत्ताच या रस्त्याची अशी अवस्था असल्याने भविष्यात हा रस्ता टिकणार नसल्याचे प्रभाग १५ मधील नागरिकांचे म्हणणे आहे, सदरील वार्ड हा नगराध्यक्षाचा असून, नगराध्यक्षाच्या वार्डात बोगस काम होत असल्याने नागरिकांत तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. सदरील सिमेंट काँक्रीट रस्त्याचे काम चांगल्या दर्जाचे नाही केल्यास आंदोलन करणार असल्याचे प्रभाग १५ मधील नागरिक फिरोज मोमीन, दयानंद महानुरे, शकील मनियार, सत्तार कुरेशी, प्रशांत देवकते, जमीर तांबोळी, प्रताप भंडे, नूर शेख, मन्सूर शेख, तय्यब शेख, फय्याज शेख, कलीम शेख, रमेश खताळ, राजीव सोलंकर, आदींनी इशारा दिला आहे.

# गौण खनिजाची बेकायदेशीरपणे वाहतूक करणाऱ्यावर महसूल विभागाची कारवाई

**भिवंडी : वार्ताहर**

रेतीची अवैधपणे बेकायदेशीरपणे वाहतूक करणाऱ्या रेती माफियाच्या विरोधात कोपर ग्राम महसूल अधिकारी रमेश रामराव सूर्यवंशी यांनी त्यांच्या पथकासह कारवाई केली आहे. तर याप्रकरणी नारपोली पोलिस ठाण्यात रमेश सूर्यवंशी यांच्या फिर्यादीवरून रेतीची बेकायदेशीरपणे वाहतूक करणाऱ्या चालकाच्या विरोधात भान्यासंसह महाराष्ट्र जमीन महसूल संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, काल्हेर, कशेळी, कोपर गावातून गौण खनिजाचे अवैधपणे उत्खनन आणि वाहतूक होत असल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात भिवंडी तहसीलदार अभिजित खोले यांच्याकडे प्राप्त झाल्याने त्यांनी संबंधित रेती माफियांवर कारवाईचे लेखी, मौखिक आदेश संबंधित महसूल विभागाला दिले आहेत. त्यानुषंगाने कोपर ग्राम महसूल अधिकारी रमेश रामराव सूर्यवंशी हे ग्राम महसूल अधिकारी पालखने मनोज नवले, ग्राम महसूल अधिकारी जुनांदुर्खी रुपेश कारभारी, ग्राम महसूल अधिकारी चिंबिपाडा किसन हांबीर असे पथकासह बुधवारी कोपर गावातील दोस्ती ग्रेटर ठाणे येथे १ एप्रिल रोजी गस्त करीत असताना सदर पथकाला केवणी गावाकडून भिवंडी ठाणे मुख्य रस्त्याकडे रेतीने भरलेला हायवा ट्रक क्रमांक एमएच ४६ सीयू ९३७२ हा जात असताना दिसला. त्यावेळी महसूल पथकाने चालकाला रेतीची कायदेशीरपणे वाहतूक करण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्याचे सांगितले. मात्र चालकाने महसूल अधिकाऱ्यांशी हुज्जत घालून घटनास्थळावरून टेम्पोची चावी घेवून पलायन केले आहे. त्यामुळे शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी ग्राम महसूल अधिकारी रमेश सूर्यवंशी यांच्या फिर्यादी वरून चालक मनोज याच्या विरोधात नारपोली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येवून पोलिसांनी ट्रकसह अवैधपणे वाहतूक केली जाणारी रेती असा १५ लाख १५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. तर महसूल विभागाच्या या कारवाईने अवैधपणे गौण खनिजाची चोरी करणाऱ्या माफियांमध्ये एकच खळबळ उडाली असून महसूल विभागाकडून अशा रेती माफियांवर कारवाई सुरूच राहणार असल्याची माहिती ग्राम महसूल अधिकारी रमेश सूर्यवंशी यांनी दिली आहे.

**ट्रकसह १५ लाखांचा मुद्देमाल जप्त**




# राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातर्फे केंद्रे दाम्पत्याचा सत्कार




**लातूर : वार्ताहर**

शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत 'नवराष्ट्र'तर्फे एज्युकॉन पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याबद्दल राजमाता जिजामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, तुळजाभवानी विद्यालय व राजमाता जिजामाता एम.सी.व्ही.सी. शाखेच्यावतीने राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे व अध्यक्षा के. ए. जायेभाये यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी राजमाता जिजामाता कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, समन्वयक अश्विनी केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक वैशाली केंद्रे, राजीव मुंढे, प्राचार्य जी.आर. मुंडे, राजेंद्र जायेभाये, प्रा. राजकुमार जाधव, विष्णू कराड, शिवकांत वाडीकर, परमेश्वर गित्ते यांची प्रमुख उपस्थिती होती. सत्काराला उत्तर देताना प्राचार्य डी. एन. केंद्रे म्हणाले, राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाने गुणवत्तेत गरूडझेप घेतली असून संकुलातर्फे गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासोबतच विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. या संकुलाने अनेक जिल्हाधिकारी, शिक्षक, डॉक्टर, इंजिनिअर घडविले आहेत. या संकुलात २५०० विद्यार्थी शिकत असून १२१ कर्मचारी कार्यरत आहेत. आगामी शैक्षणिक वर्षात १२१ मुली दत्तक घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

स्मार्ट बोर्ड, इन्ट्रॅक्ट बोर्ड, डिजिटल क्लासरूम, स्मार्ट क्लासरूमच्या माध्यमातून कौशल्य विकासावर आधारित अभ्यासक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देण्यात येणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली. तसेच ११वी कला शाखेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एमएससीआयटीचे शिक्षण देण्यात येणार असल्याची घोषणाही प्राचार्य डी.एन. केंद्रे यांनी केली. प्रारंभी राजीव मुंढे यांनी स्वागत गीत गायीले. या सत्कार सोहळ्याचे सूत्रसंचालन मदन धुमाळ यांनी केले तर आभार प्रा. बी. बी. खटके यांनी मानले.

# उदगीरमध्ये पोलीस निरीक्षक आणि पोलिस हवलदार एसीबीचा जाळ्यात

**उदगीर : वार्ताहर**



उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या एका गुन्ह्यातील आरोपीला अटक न करण्यासाठी आणि तपासात मदत करण्यासाठी तीन लाख रुपये लाचेची मागणी करणारे पोलीस निरीक्षक राजकुमार पुजारी व पोलीस हवलदार राहुल नागरगोजे यांना तडजोडीअंती ४५ हजार रुपयाची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडल्याची घटना घडली आहे. या घटनेने पोलीस दलात एकच खळबळ उडाली असून लाचखोर पोलिसांचे धाबे दणाणले आहेत.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रारदार यांच्या मेव्हण्या विरोधात खोटा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस निरीक्षक राजकुमार पुजारी यांनी आरोपीला अटक न करण्यासाठी आणि तपासात मदत करण्यासाठी तीन लाख रुपये लाचेची मागणी केल्याचा आरोप करून लातूर येथील लाचलूचपत प्रतिबंध विभागाकडे १ एप्रिल २०२६ रोजी तक्रार दाखल करण्यात आली होती. या तक्रारीची दखल घेत लातूर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने २ एप्रिल २०२६ रोजी तक्रारीची पडताळणा करून उदगीर मध्ये सापळा लावला होता. ३ लाखाच्या मागणीवरून तडजोड होत ५० हजार रुपये लाच घेण्याचे लाचखोर अधिकारी व त्यांचा खास कर्मचाऱ्यांने पंचा समक्ष तयारी दर्शवली. दरम्यान पोलीस हवलदार राहुल नागरगोजे यांनी पोलीस निरीक्षक राजकुमार पुजारी यांच्या सांगण्यावरून ४५ हजार रुपयेची लाच स्वीकारली. त्यावेळी लाचलुचपत प्रतिबंधक विभागान उदगीर ग्रामीण पोलिस ठाण्यातील पोलीस हवलदार राहुल नागरगोजे व पोलीस निरीक्षक राजकुमार पुजारी यांना ताब्यात घेऊन अटक केली. रात्री उशिरा उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्यात दोघाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान आरोपींना न्यायालयासमोर उभे केले असता न्यायालयाने त्यांना दोन दिवसाची पोलीस कोठडी दिली असल्याची माहिती लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक विशाल बहात्तरे यांनी दिली.

# सेवालयाच्या विद्यार्थ्यांचे राज्यस्तरीय स्पर्धेत यश

**लातूर : वार्ताहर**

राज्य शासनाचा महिला व बाल कल्याण विभाग व सोलापूर येथील सिंहगड इन्स्टिट्यूटच्या वतीने सोलापूर येथे झालेल्या पहिल्या राज्यस्तरीय चाचा नेहरू बाल महोत्सव स्पर्धेत हासेगावच्या सेवालय बालगृहातील एचआयव्ही संक्रमित अनाथ विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन एका सुवर्णपदकासह अन्य पारितोषिके पटकावत यश संपादन केले आहे. या महोत्सवात राज्यभरातून ९०० पेक्षा अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. त्यात छत्रपती संभाजीनगर विभागातून निवड झालेल्या हासेगावच्या सेवालय बालगृहातील मुलांनी लातूर जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व केले. लातूर जिल्ह्यातून एकूण ८ स्पर्धक सहभागी झाले होते. त्यात एकट्या सेवालय बालगृहातील ५ मुलांचा समावेश होता. या महोत्सवात सेवालातील विद्यार्थ्यांनी निबंध, चित्रकला, वक्तृत्व, बुध्दिबळ, कॅरम, खो-खो, सुंदर हस्ताक्षर, मशाल धाव, रिले या स्पर्धांमध्ये सहभागी होत विजय मिळविले आहेत. सेवालयातील मुले ही एचआयव्ही संक्रमित आहेत. सर्वसामान्यांप्रमाणेच या विद्यार्थ्यांनीही स्पर्धेत सहभागी होऊन चाचा नेहरू महोत्सवात आपली मोहोर उमटविली आहे. मुलांच्या या यशाबद्दल सेवालय बालगृहाचे संस्थापक प्रा.रवी बापटले यांच्यासह, प्रा.शैलजा बरुरे, प्रा.मनोज मोठे, रचना बापटणे, अधीक्षिका पूजा जयगावकर यांनी कौतुक केले आहे.

# उल्हासनगरमध्ये अमली पदार्थांवर पोलिसांची मोठी कारवाई



**उल्हासनगर : वार्ताहर**

उल्हासनगर मध्ये अमली पदार्थावर पोलिसांनी कारवाई केली. ७०० ग्राम गांजासह एकाला अटक करण्यात आली. उल्हासनगर कॅम्प तीनच्या संजय गांधी नगर परिसरात स्कायवॉकखाली अमली पदार्थाची विक्री सुरू असल्याची गुप्त माहिती मध्यवर्ती पोलीस ठाण्याच्या पथकाला मिळाली. या ठिकाणी सापळा रचून अशोक रोकडे व्यक्तीस ताब्यात घेत ७०० ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला आहे. आरोपी विरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आले. आरोपीला न्यायालयात हजर केले असता तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या कारवाईमुळे परिसरातील अमली पदार्थ विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली असून आरोपीने गांजा नेमका कुठून आणला याचा तपास पोलीस करीत आहेत. आजकाल युवा पीडीचा कल नसेच्या आहारी जाण्याचा ज्यास्त वाढलेला दिसून येत आहे. काही दिवसा अगोदर परिमंडळ ४ हद्दीत सुमारे सव्वा चार कोटी किमतीचा आमली पदार्थ पकडण्यात आला होता. त्याच अनुषंगाने सामाजिक कार्यकर्त्यांनी पोलीस उपायुक्त यांना अमली पदार्थ विक्रेत्यांवर कारवाई होण्यास निवेदन दिले होते. मध्यवर्ती पोलीस स्टेशनंची मोठी कारवाई, वपोनी शंकर अवताडे म्हणाले की, आमली पदार्थ विक्रेत्यांचा शोध चालूच आहे. पोलीस स्टेशन हद्दीत आमली पदार्थ विक्रेते आढळून आल्यास विक्रेत्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल आहे.



## वसई विरार शहर महानगरपालिका

**प्रभाग समिती 'डी' आचोळे, नालासोपारा (पु.)**

**(दुरध्वनी क्रमांक ७२१९३७०००६/७२१९३७०००९)**

**जाहिर नोटीस**

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'डी' कार्यालय आचोळे नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'डी' कार्यालय आचोळे नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | रिसीट नं. | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरीददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १. | आचोळे-१० | ३८/११ | २९२४९ | मुत्ता बतुला मोहन | नुतन उमाचला साहू व उमाचल साहू |
| २. | आचोळे-१० | ३२५/३ | २९१७९ | मेहूल एन. भावसार व मानसी भावसार | महिमा नितीश जयसवाल व नितीश प्रेमशंकर जयसवाल |
| ३. | आचोळे-१० | ३२४/५१ | २९१०८ | फॅन्नी डीकुज | ब्रजेश कुमार सिंह |
| ४. | आचोळे-१० | ४५६/५१ | २९१५१ | मिथुल गोरडीया | श्रद्धा लालजी आर्या |
| ५. | आचोळे-१० | ३९५/७ | २९२९० | अनिता खन्ना व प्रदिप खन्ना | धिरेंद्र चंद्रश्वर झा |
| ६. | आचोळे-०९ | ७३३/५ | २९७१३ | श्रीधर दत्ताराम मोरे | शुभांगी अतुल घोलप |
| ७. | आचोळे-०९ | ७५०/२८ | २९१६० | पद्माकर जोमा पाटील | वैशाली विनोद भोईर |
| ८. | आचोळे-०९ | ७५०/२० | २९६९८ | पद्माकर जोमा पाटील | हरेश्वर पद्माकर पाटील |
| ९. | आचोळे-०९ | ७१३/८ | २९१६९ | सुरेश नामदेव गुळे | परसमल व कांचनदेवी प्रजापती |
| १०. | आचोळे-०९ | ४४२/२१ | २९२५४ | एम डिसोजा/सुराणा बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स | दिपक बळीराम कदम |
| ११. | आचोळे-०९ | ७५०/१५ | २९१६४ | पद्माकर जोमा पाटील | वैशाली विनोद भोईर |
| १२. | आचोळे-०९ | ७५०/२६ | २९१५८ | पद्माकर जोमा पाटील | वैशाली विनोद भोईर |
| १३. | आचोळे-०९ | ७५०/१८ | २९१५६ | पद्माकर जोमा पाटील | हरेश्वर पद्माकर पाटील |
| १४. | आचोळे-०९ | ७५०/६ | २९१५४ | पद्माकर जोमा पाटील | हरेश्वर पद्माकर पाटील |
| १५. | आचोळे-०९ | ५३५/१२ | २९२१२ | प्रल्हाद मांजरेकर | सुनिलकुमार रामानंदन पांडे व अंकिता सुनिल पांडे |
| १६. | आचोळे-०८ | २६/२० | २९१०५ | केतन दामजी शेठीया | प्रेमसिंह खरवड व पुष्पा प्रेमसिंह खरवड |
| १७. | आचोळे-०८ | १२६/३१ | २९२६४ | गणेश नारायण मुलिया | केतन दुल्लभभाई मांडलिया |
| १८. | आचोळे-०८ | १४६/१५ | २९२९४ | परेश बाग | शंकेश शांताराम लांबे व सुजाता शंकेश लांबे |
| १९. | आचोळे-०८ | ७४/२० | २९२९६ | दिनेश शांताराम धावडे | जागृती विनोद चिखलकर |
| २०. | आचोळे-०७ | १२/५३ | २९१८४ | सरिता शरद ठाकूर | मानस अशोक मंडल व शतरुपा मानस मंडल |

जावक क्र. वविशम/कवि/४५१६/२०२५-२०२६
दिनांक : ३०/०३/२०२६

सही/-
**सहा.आयुक्त**
प्रभाग समिती 'डी' आचोळे
वसई विरार शहर महानगरपालिका

# आता आरपारच्या लढाईची वेळ!

सध्याचे राजकारण इतके गढूळ झाले आहे की स्वतःच्या टक्क्यांवर राज्यात किंवा केंद्रात बहुमत मिळवण्याची ताकत नसलेले पक्ष दुसऱ्या पक्षाचे आमदार खासदार फोडून सरकारे बनवत आहेत. सध्या भाजपा आणि त्यांच्या सोबत असलेल्या शिंदेंकडून अशीच फोडाफोडी सुरू आहे. त्यामुळे या लोकांच्या बाबतीत जनतेने टोकाचा निर्णय घेतला नाही तर या देशातील लोकशाही कायमची संपुष्टात येईल. कारण या लोकांना जनतेची अजिबात भीती राहिलेली नाही. यांच्या मनात जनतेची दहशत निर्माण होणे आवश्यक आहे. ती कशी निर्माण करायची याचा विचार जनतेने करायला हवा. अन्यथा या फोडाफोडीचे राजकारणात जनतेचे फार मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. निवडणुकीत उभ्या असलेल्या कुठल्यातरी पक्षाच्या उमेदवाराकडून हजार पाचशे रुपये घेऊन त्याला मतदान करायचे आणि निवडून गेलेल्या लोक प्रति ज्याच्या विरुद्ध निवडणूक लढवली त्याच्याच अक्षय जायचे आणि त्याला निवडून देणाऱ्या मतदाराने हे सर्व उघड्या डोळ्यांनी बघायचे हे कुठे तरी थांबायला हवे. तरच लोकशाही वाचेल. मुंबई: गेल्या दोन–तीन वर्षापासून महाराष्ट्राच्या राजकारणात सुरू असलेले 'नाट्य' अद्याप संपलेले नाही, असेच चित्र सध्या दिसत आहे. २०२२ मध्ये शिवसेनेतील मोठ्या बंडांनंतर आणि त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पडलेल्या फुटीनंतर आता पुन्हा एकदा राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, एकनाथ शिंदे यांनी तूर्तास 'ऑपरेशन टायगर'ऐवजी 'ऑपरेशन तुतारी' सुरू केले असल्याची माहिती समोर आली आहे. शरद पवारांचे खासदार शिंदेच्या रडारवर आले असून पडद्यामागे मोठ्या घडामोडी घडत आहेत. सध्याचे राजकारण इतके गढूळ झाले आहे की स्वतःच्या टक्क्यांवर राज्यात किंवा केंद्रात बहुमत मिळवण्याची ताकत नसलेले पक्ष दुसऱ्या पक्षाचे आमदार खासदार फोडून सरकारे बनवत आहेत. सध्या भाजपा आणि त्यांच्या सोबत असलेल्या शिंदेंकडून अशीच फोडाफोडी सुरू आहे. त्यामुळे या लोकांच्या बाबतीत जनतेने टोकाचा निर्णय घेतला नाही तर या देशातील लोकशाही कायमची संपुष्टात येईल. कारण या लोकांना जनतेची अजिबात भीती राहिलेली नाही. यांच्या मनात जनतेची दहशत निर्माण होणे आवश्यक आहे. ती कशी निर्माण करायची याचा विचार जनतेने करायला हवा. अन्यथा या फोडाफोडीचे राजकारणात जनतेचे फार मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. निवडणुकीत उभ्या असलेल्या कुठल्यातरी पक्षाच्या उमेदवाराकडून हजार पाचशे रुपये घेऊन त्याला मतदान करायचे आणि निवडून गेलेल्या लोक प्रति ज्याच्या विरुद्ध निवडणूक लढवली त्याच्याच अक्षय जायचे आणि त्याला निवडून देणाऱ्या मतदाराने हे सर्व उघड्या डोळ्यांनी बघायचे हे कुठे तरी थांबायला हवे. तरच लोकशाही वाचेल. मुंबईत गेल्या दोन–तीन वर्षांपासून महाराष्ट्राच्या राजकारणात सुरू असलेले 'नाट्य' अद्याप संपलेले नाही, असेच चित्र सध्या दिसत आहे. २०२२ मध्ये शिवसेनेतील मोठ्या बंडांनंतर आणि त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पडलेल्या फुटीनंतर आता पुन्हा एकदा राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, एकनाथ शिंदे यांनी तूर्तास 'ऑपरेशन टायगर'ऐवजी 'ऑपरेशन तुतारी' सुरू केले असल्याची माहिती समोर आली आहे. शरद पवारांचे खासदार शिंदेच्या रडारवर आले असून पडद्यामागे मोठ्या घडामोडी घडत आहेत. ऑपरेशन टायगर अंतर्गत राबवणाऱ्या ापरेशन तुतारीला भाजप हायकमांडने ब्रेक लावल्याची माहिती समोर येत आहे. उपमुख्यमंत्री आणि शिवसेना शिंदे गटाचे नेते एकनाथ शिंदे यांना ापरेशन तुतारी राबवण्यास भाजपकडून रेड सिग्नल देण्यात आला. तुतारी म्हणजे शरद पवारांच्या राष्ट्रवादीतील खासदारांना एनडीएमध्ये यायचं असेल तर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या पक्षाकडून यावं, असा सल्ला भाजप हायकमांडने एकनाथ शिंदे यांना दिला. तुतारीचे ६ खासदार आणि शिवसेना ठाकरे गटाचे ६ खासदार फोडण्याची एकनाथ शिंदेची तयारी होती. सध्या शिवसेना शिंदेंकडे ६ खासदार आहेत. जर शरद पवार गटाचे ६ आणि ठाकरे गटाचे ६ खासदार एकनाथ शिंदेंकडे आल्यास एकूण १९ खासदार शिवसेना शिंदे गटाचे होतील. त्यामुळे १९ खासदारांचा संख्याबळावर राज्यातील बार्गेनिंग पॉवर वाढवणं. तसेच या निवडणुकीत किमान १९ जागांवर एकनाथ शिंदे दावा करणार असल्याची रणनीती होती. परंतु भाजपकडून एकनाथ शिंदेंच्या या रणनीतीला अद्याप ग्रीन सिग्नल देण्यात आलेला नाहीय. मागील दिल्ली भेटीत केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी एकनाथ शिंदेंना भेट दिली नसल्याचे समजते. ऑपरेशन टायगर अंतर्गत राबवणाऱ्या ऑपरेशन तुतारीला भाजप हायकमांडने ब्रेक लावल्याची माहिती समोर येत आहे. उपमुख्यमंत्री आणि शिवसेना शिंदे गटाचे नेते एकनाथ शिंदे यांना ऑपरेशन तुतारी राबवण्यास भाजपकडून रेड सिग्नल देण्यात आला. तुतारी म्हणजे शरद पवारांच्या राष्ट्रवादीतील खासदारांना एनडीएमध्ये यायचं असेल तर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या पक्षाकडून यावं, असा सल्ला भाजप हायकमांडने एकनाथ शिंदे यांना दिला. तुतारीचे ६ खासदार आणि शिवसेना ठाकरे गटाचे ६ खासदार फोडण्याची एकनाथ शिंदेची तयारी होती. सध्या शिवसेना शिंदेंकडे ६खासदार आहेत. जर शरद पवार गटाचे ६ आणि ठाकरे गटाचे ६ खासदार एकनाथ शिंदेंकडे आल्यास एकूण १९ खासदार शिवसेना शिंदे गटाचे होतील. त्यामुळे १९ खासदारांचा संख्याबळावर राज्यातील बार्गेनिंग पॉवर वाढवणं. तसेच च्या निवडणुकीत किमान १९ जागांवर एकनाथ शिंदे दावा करणार असल्याची रणनीती होती. परंतु भाजपकडून एकनाथ शिंदेंच्या या रणनीतीला अद्याप ग्रीन सिग्नल देण्यात आलेला नाहीय. मागील दिल्ली भेटीत केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी एकनाथ शिंदेंना भेट दिली नसल्याची विश्वसनीय सूत्रांची माहिती आहे. शिंदे जनतेच्या नजरेत खलनायक आहे. कारण त्यांनी शिवसेना फोडून मराठी माणसांचा विश्वासघात केलेला आहे. त्यामुळे आज ना उद्या मराठी माणूस शिंदेंना त्यांच्या कर्माची फळे भोगायला लावल्याशिवाय राहणार नाही. पण हे सर्व घडत असताना मतदारांना शांत बसून चालणार नाही. कारण हे लोक मतदारांचा विश्वासघात करीत आहे. त्यामुळे मतदारांना आता टोकाचा निर्णय घेण्याची वेळ आली आहे आणि हा निर्णय घेतला नाही तर भविष्यात इंग्रजांच्या राजवटीत जी गुलामीची स्थिती होती त्याहीक्षा भयंकर स्थिती निर्माण होईल.त्यामुळे राजकारणी लोकांचे अंधभक्त होण्यापेक्षा डोळसे त्यांच्या दुष्कृत्यांकडे पहा आणि त्यानंतरच त्यांच्या विषयी काय करायचे ते ठरवा. कारण अंधभक्त कार्यकर्त्यांमुळे आणि बेफिकीर मतदारांमुळे मुजोर आणि भ्रष्ट नेते तयार होतात आणि संपूर्ण लोकशाहीच वेठीस. त्यामुळे अशा नेत्यांच्या विरोधात आरपार्क लढाईची वेळ आली आहे.

# महिला व बालकांच्या पोषणात लक्षणीय सुधारणेचे उदिष्ट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई : वार्ताहर

राज्यातील कुपोषणाच्या समस्येवर मात करुन महिला व बालकांच्या आरोग्य आणि पोषणात लक्षणीय सुधारणा घडवून आणण्याच्या दिशेने महाराष्ट्राने महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे. महिला व बाल विकास विभाग आणि चिल्ड्रन्स इन्व्हेस्टमेंट फंड फाउंडेशन (CIFF) यांच्यात महिला व बालकांच्या पोषणा संदर्भात पाच वर्षासाठी सामंजस्य करार (MoU) करण्यात आला असून, या भागीदारीमुळे माता व बाल पोषण निर्देशांकात मोठी उंची गाठली जाईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. महिला व बाल विकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव यांच्या उपस्थितीत हा करार झाला. यावेळी चिल्ड्रन्स इन्व्हेस्टमेंट फंड फाउंडेशनच्या कार्यकारी संचालक मंजुला सिंग, डायरेक्टर स्ट्रॅटेजिक इनिशिएटिव्ह्ज अँड पार्टनरशिप्स अखिल पाळीअथ आणि अन्य वरिष्ठ प्रतिनिधी उपस्थित होते. या कराराअंतर्गत कुपोषणावर प्रभावी नियंत्रणासाठी विशेष भर देण्यात येणार आहे.

**योग्य पोषण आणि आरोग्य सवयी रुजवण्यासाठी मोहीम**

प्रधानमंत्री मातृ वंदना योजना (PMMV) सारख्या थेट लाभ हस्तांतरण योजनांचा लाभ अधिकाधिक पात्र महिलांपर्यंत पोहोचवून त्यांचा प्रभावी वापर सुनिश्चित केला जाणार आहे. सुरुवातीच्या टप्प्यात पालघर, जालना, नंदुरबार, गडचिरोली आणि अमरावती या जिल्ह्यांमध्ये यासंदर्भातील अंमलबजावणी करण्यात येणार असून, राज्यस्तरावरही तांत्रिक साहाय्य दिले जाणार आहे. तसेच, सीआयएफएफ कडून पोषण व सार्वजनिक आरोग्य तज्ज्ञांची नियुक्ती करून प्रभावी जनजागृती आणि संदेशवहनाला चालना दिली जाणार आहे. गर्भधारणेपासून बालकाच्या आयुष्यातील पहिल्या १००० दिवसांदरम्यान योग्य पोषण आणि आरोग्य सवयी रुजवण्यासाठी व्यापक मोहीम राबविण्यात येणार आहे. पुराव्यावर आधारित उपाययोजना, तांत्रिक साहाय्य आणि क्षेत्रीय कर्मचाऱ्यांच्या क्षमता विकासाच्या माध्यमातून सेवा अधिक सक्षम केली जाईल. कार्यक्रमांचे रिअल–टाइम निरीक्षण, डेटाआधारित निर्णय प्रक्रिया आणि सक्षम मॉनिटरिंग प्रणालीमुळे योजनांची गुणवत्ता आणि परिणामकारकता वाढविण्यात येणार आहे. या भागीदारीमुळे सेवा वितरण यंत्रणा अधिक बळकट होऊन महिला व बाल विकास विभागाच्या योजनांची पोहोच आणि गुणवत्ता वाढेल. परिणामी, महाराष्ट्रातील माता व बालकांच्या आरोग्यपूर्ण आणि सक्षम भविष्यास नवी दिशा मिळणार असल्याची माहिती महिला व बालविकास विभागामार्फत देण्यात आली आहे.

# 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' अभियानाला प्रारंभ

मुंबई : वार्ताहर

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि ग्रामीण जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा त्यांच्या उंबरठ्यावर उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारने माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' हे अत्यंत महत्त्वाकांक्षी अभियान सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या पुढाकाराने राबविण्यात येणाऱ्या या राज्यव्यापी अभियानाला १ एप्रिलपासून प्रारंभ होत आहे.

हे अभियान फक्त सरकारी कार्यक्रमापुरते मर्यादित न राहता, लोकसहभागाद्वारे त्यातून एक व्यापक आरोग्य चळवळ उभी राहावी, असा राज्य शासनाचा मानस आहे. या अभियानांतर्गत प्रत्येक गाव आरोग्यसंपन्न केले जाणार आहे. या प्रस्तावित योजनेमुळे गावापासून ते राज्यस्तरावरील आरोग्य सेवांचे आणि यंत्रणांचे सक्षमीकरण होण्यास मदत होणार आहे. तसेच या उपक्रमामुळे तळागाळातील लोकांपर्यंत वैद्यकीय सेवा पोहोचणार आहेत. 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' या अभियानाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे उपचारांपेक्षा प्रतिबंधावर भर, हे आहे. ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्यविषयक सामाजिक वर्तणुकीत सकारात्मक बदल घडवून आणणे आणि त्यांच्यात आरोग्यदायी जीवनशैली रुजवणे हे या मोहिमेचे मुख्य उद्दिष्ट आहे. यामध्ये फक्त आजारांवर उपचार करण्यापेक्षा ते होऊ नयेत यासाठी सार्वजनिक स्वच्छता, शुद्ध पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन आणि पोषण यासारख्या मूलभूत घटकांवरही विशेष लक्ष केंद्रित केले जाणार आहे. संसर्गजन्य आजारांसोबतच बदलत्या जीवनशैलीमुळे उद्भवणारे असंसर्गजन्य आजार, माता–बाल आरोग्य आणि मानसिक आरोग्य यासारख्या विषयांनाही या मोहिमेत सामावून घेण्यात आले आहे. या अभियानात ग्रामपंचायतीपासून ते जिल्हा परिषदेच्या आरोग्य यंत्रणा सक्रियपणे सहभागी होणार आहेत. गावागावात स्वच्छतेचा आणि आरोग्याचा जागर करून आरोग्यदायी गाव ही संकल्पना राबवण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न असणार आहे.

**सुदृढ गावांना मिळणार 'आरोग्यसंपन्न गाव' किताब**

माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य स्तरापासून ते ग्रामपंचायत स्तरापर्यंत तीन टप्प्यांवर समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय समिती ही अभियानाच्या संपूर्ण प्रक्रियेवर देखरेख ठेवणार आहे. तर आरोग्य विभागाच्या प्रधान सचिवांच्या नेतृत्वाखालील कृती समिती प्रत्यक्ष कामाचे नियोजन करणार आहे. त्याचबरोबर गाव पातळीवर आरोग्याचे मूल्यांकन करण्यासाठी विशिष्ट निकष ठरवण्यात आले आहेत. या निकषांच्या आधारे ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या गावांना आरोग्यसंपन्न गाव' म्हणून गौरविण्यात येणार आहे. अशा गावांना स्मृतिचिन्हे, प्रमाणपत्र आणि रोख रकमेचा पुरस्कार देऊन प्रोत्साहित केले जाणार आहे. या संपूर्ण अभियानासाठी राज्य सरकारने ८०.७५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. अभियानात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, गाव, प्राथमिक आरोग्य केंद्र यांना कोट्यवधी रुपयांपर्यंतची बक्षिसे दिली जाणार आहेत.

**२ ते ५ कोटींचे पुरस्कार**

राज्य स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करीत पहिला क्रमांक मिळवणाऱ्या जिल्हा परिषदेला ५ कोटी रुपये, दुसऱ्या क्रमांकाला ३ कोटी रुपये आणि तिसऱ्या क्रमांकासाठी २ कोटी रुपये दिले जाणार आहेत. जिल्हा परिषदेनंतर पंचायत समिती स्तरावरही प्रोत्साहनासाठी मोठ्या रक्कमेची तरतूद आहे. ज्यामध्ये पहिल्या क्रमांकाला २ कोटी, दुसऱ्या क्रमांकाला १.५ कोटी रुपये आणि तिसऱ्या क्रमांकाला १.२५ कोटी रुपये दिले जाणार आहेत. राज्य स्तरावर सर्वोत्तम ठरणाऱ्या ग्रामीण रुग्णालय आणि उपजिल्हा रुग्णालयांना ७५ लाख रुपयांचा विशेष पुरस्कार दिला जाणार आहे. उपआरोग्य केंद्रांना पहिल्या क्रमांकासाठी जिल्हा आणि राज्यस्तरासाठी अनुक्रमे ५ लाख आणि २५ लाख रुपये दिले जाणार आहे. तर प्राथमिक आरोग्य केंद्रांना जिल्हा स्तरावर १० लाख आणि राज्य स्तरावर ५० लाखांचा पुरस्कार दिला जाणार आहे. त्याचबरोबर गावांनाही पहिल्या क्रमांकासाठी जिल्हा, विभाग राज्य स्तरासाठी अनुक्रमे २५ लाख, १ कोटी आणि ५ कोटी रुपयांचे पुरस्कार दिले जाणार आहेत. हे अभियान दरवर्षी १ एप्रिल ते ३१ मार्च या आर्थिक वर्षाच्या कालावधीत राबवले जाणार असल्याने, प्रत्येक वर्षी गावांना आपली कामगिरी सुधारण्याची आणि पुरस्कार मिळवण्याची संधी मिळणार आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जयंती त्यांच्या विचारांचा उत्सव म्हणून साजरी करूया –मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंतीच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने आढावा बैठक संपन्न

मुंबई : वार्ताहर

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या विचारांनी आणि संविधानाने देशाला प्रगतीची दिशा मिळाली आहे. त्यांचे कार्य आणि त्यांनी समाजाच्या उन्नतीसाठी दिलेले योगदान समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवणे हे अत्यंत आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त होणारा कार्यक्रम दरवर्षी अधिक उत्कृष्ट करण्याचा प्रयत्न राज्य शासन करत असून, यावर्षीही विविध विभागांच्या समन्वयातून तो अधिक भव्य स्वरूपात साजरा करण्यात येईल. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचा सोहळा त्यांच्या विचारांचा उत्सव म्हणून साजरा करूया असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १४ एप्रिल, २०२६ रोजीच्या १३५ व्या जयंतीच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे आढावा बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीस बैठकीस सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, माजी राज्यमंत्री भाई गिरकर, माजी आमदार प्रकाश गजभिये, मुंबई महापालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे, अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव गोविंदराज, कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल, मुंबईचे पोलीस आयुक्त देवेन भारती, प्रधान सचिव श्रीकर परदेशी, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, भन्ते डॉ. राहूल बोधी महाथेरो, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाणदिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे, दादर चैत्यभूमी स्मारक समितीचे प्रतिनिधी यांच्यासह विविध विभागाचे अपर मुख्य सचिव,



प्रधान सचिव, सचिव उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महापुरुषांच्या जयंती साजरी करण्यामागील उद्देश केवळ औपचारिकता नसून त्यांच्या विचारांची आणि कार्याची प्रेरणा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविणे असा आहे. डॉ. आंबेडकरांनी दिलेले संविधान हे जगातील सर्वोत्तम संविधानांपैकी एक असून, त्यातील समावेशकतेच्या तत्त्वामुळे भारत विकसित राष्ट्राकडे वाटचाल करत आहे. समाजाला मिळणाऱ्या संधी, हक्क आणि प्रगती यामागे कोणाचे योगदान आहे, हे नव्या पिढीला समजणे आवश्यक आहे. त्यामुळे जयंती सोहळा हा केवळ उत्सव न राहता विचारांचा प्रसार करणारा पर्व ठरतो. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या दि.१४ एप्रिल २०२६ रोजी होणाऱ्या जयंती उत्सवासाठी देशभरातून लाखो नागरिक चैत्यभूमीवर येतात. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर चैत्यभूमी परिसरात अभिवादनासाठी येणाऱ्या अनुयायी आणि नागरिकांसाठी आवश्यक सोयीसुविधांची सर्वकष व्यवस्था करण्यात यावी. उष्णतेपासून संरक्षण मिळावे यासाठी ठिकठिकाणी मंडप उभारण्यात यावेत. प्रामुख्याने पिण्याच्या पाण्याची व्यवस्था उपलब्ध ठेवावी. तसेच, दादर आणि परिसरातील वाहतूक सुरळीत राहावी यासाठी वाहतूक पोलिसांनी योग्य नियोजन करून नियंत्रण ठेवावे,असे निर्देशही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी संबधित अधिकाऱ्यांना दिले. नागरिकांना मार्गदर्शन होण्यासाठी विविध ठिकाणी सूचना फलक लावावेत. बेस्ट प्रशासनाने दादर रेल्वे स्थानक ते चैत्यभूमी दरम्यान पुरेशा प्रमाणात बससेवा उपलब्ध करून द्यावी, जेणेकरून नागरिकांची ये–जा अधिक सुलभ होईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती देशासह जगभर मोठ्या प्रमाणावर साजरी होत असल्याचा उल्लेख करत, हा सोहळा अधिक उत्तम पद्धतीने साजरा करण्याची जबाबदारी आपली असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले. मंत्री संजय शिरसाट म्हणाले,भारतीय संविधान प्रत्येक घरापर्यंत पोहोचवण्याचा उपक्रम विभागामार्फत हाती घेण्यात आला असून, जिल्हाधिकारी कार्यालयांच्या माध्यमातून त्याची अंमलबजावणी सुरू आहे.

नागरिकांमध्ये संविधानाबाबत जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. डॉ. बाबसाहेब आंबेडकरांचा शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा संदेश लक्षात घेऊन विद्यार्थ्यांसाठी मोठ्या प्रमाणावर वसतिगृहांची उभारणी करण्यात येत आहे. जयंती सोहळ्याच्या निमित्ताने यावर्षी काही विशेष उपक्रमही राबविण्यात येणार आहेत. १३ एप्रिल रोजी सायंकाळी ड्रोनच्या माध्यमातून डॉ. आंबेडकरांच्या जीवनावर आधारित भव्य ड्रोन शो चैत्यभूमी परिसरात सादर करण्यात येणार आहे. या बैठकीत पोलीस पथक मानवंदना, चैत्यभूमीवर हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी, शिवाजी महाराज मैदानावरील भव्य निवास मंडप, तेथील आपत्कालीन व्यवस्थेसह, आरोग्य सुविधा, प्रदर्शन मंडप, चैत्यभूमी स्तूप व परिसराची सजावट, लोकराज्य मासिकाचा विशेषांक, शासकीय जाहिरात व प्रसिध्दी याबाबत चर्चा झाली व याबाबत निर्देश देण्यात आले. बैठकीत मुंबई महापालिकेच्यावतीने नियोजनाची सविस्तर माहिती सादरीकरणातून देण्यात आली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पोस्टरचे विमोचन करण्यात आले.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई–६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि.पालघर. फोन नंबर ०२५०–२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे,** कायदेशीर सल्लागार : **अॅड.रूपेश शिंदे.** न्यायकक्षा–वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

06 TO 12 APRIL 2026 - Page 5 (CRIME SANDHYA) NEW:Layout 1 4/5/2026 7:51 PM Page 1



# देवणी बस स्थानकातील उपहारगृह दीड वर्षांपासून बंद; प्रवाशाची मोठी हेळसांड; आंदोलनाच्या पवित्र्यात!




**देवणी : शकील मनियार**

देवणी येथे बांधण्यात आलेल्या नूतन बसस्थानकाच्या इमारतीचा लोकार्पण सोहळा होऊन जवळपास दीड वर्ष झाले आजतागायत बसस्थानकातील उपहारगृह महाराष्ट्र राज्य परीवहन महामंडळ प्रशासनाने चालू केले नसल्यामुळे प्रवाशाची खूपच मोठी हेळसांड होतं आहे. त्यामुळे आता देवणी येथील प्रवासी व नागरिकांच्या वतीने आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. कोठ्यावधी रुपये खर्च करून देवणीत शहरात बांधण्यात आलेल्या बस स्थानकात महाराष्ट्र राज्य परीवहन महामंडळाच्या प्रशासनाने सर्वसामान्य प्रवाशासाठी लागणाऱ्या कोणत्याही मूलभूत सोई-सुविधा उपलब्ध करून दिल्या नाहीत. त्यामुळे देवणी व देवणी तालुक्यातील व बाहेरून येणाऱ्या प्रवाशासाठी साधे पिण्याच्या पाण्याची सोय सुद्धा या बसस्थानकात नाही चहा घ्यायचा असेल तर बसस्थानकापासून बऱ्याच दूर जावे लागत आहे. अन्यथा पाणी प्यायचा असेल तर सर्वसामान्य गरीब प्रवाशाला २० रुपयांची पाणी बॉटल विकत घेऊन पाणी प्यावे लागत आहे. त्यामुळे सर्वसामान्य गरीब प्रवाशाची आर्थिक लूट होत आहे. त्यामुळे कॅन्टीन चालू होणे किती गरजेचे आहे. हे यावरून समजते तसेच बसस्थानक आणि व्यवसायिक बांधलेले गाळे प्रशासनाने जाहीर प्रकटन काढून लोकांना सोडले आहे. मात्र सदर गाळे त्या व्यवसायिकांना हस्तांतरित केले नसल्यामुळे रात्री सहा सात वाजता बसस्थानकात कोणीच राहत नाही. देवणीच बसस्थानक दारुड्याचा अड्डा बनला झाला आहे वारंवार उपहार गृह चालू करा अशी विनंती करूनही महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यांची दाखल घेतली जात नाही. त्यामुळे देवणी करात तीव्र नाराजीचा सूर आहे यांचा कधी उद्रेक होईल यांचा भरोसा नाही, त्यामुळे महाराष्ट्र राज्य परीवहन तात्काळ दाखल घेऊन उपहारगृह चालू करण्याची मागणी होतं आहे.

# देवणीत रंगल्या जंगी स्पर्धा; महादेव यात्रेत कुस्तीचा थरार



**देवणी : वार्ताहर**

देवणी शहरातील महादेव यात्रेनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या भव्य कुस्ती स्पर्धांनी यंदा उत्साहाची नवी उंची गाठली. शिव-पार्वती विवाह सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पार पडलेल्या या जंगी कुस्ती स्पर्धेला महाराष्ट्राच्या विविध भागांतून पैलवान आणि प्रेक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. दुपारी दोननंतर सुरू झालेल्या कुस्त्यांनी सायंकाळपर्यंत रंगत कायम ठेवत प्रेक्षकांना अक्षरशः खिळवून ठेवले. विविध गटांमध्ये झालेल्या चुरशीच्या लढतींमध्ये रमेश बिरादार आणि नागेश येडडे यांनी प्रत्येकी ५,००० चे पारितोषिक पटकावत दमदार विजय मिळवला. तर हनुमंत केळगिरे यांनी ३,००० चे बक्षीस जिंकत आपली ताकद सिद्ध केली. स्पर्धेतील सर्वाधिक लक्षवेधी ठरलेली अंतिम कुस्ती ११,००० च्या बक्षीसासाठी खेळविण्यात आली. या अंतिम लढतीत प्रसाद शिंदे (रा. सावरगाव, जि. लातूर) यांनी बाजी मारत मानाचा किताब पटकावला. विजेत्या पैलवानांचा माजी सरपंच देविदास पतंगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी शाल, श्रीफळ आणि चांदीची गदा देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. दत्ता तपसाळे व दिनेश तपसाळे यांच्या वतीने चांदीची गदा प्रदान करण्यात आली. तसेच महादेव मंदिरात यात्रा कमिटीच्या वतीनेही विजेत्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. या भव्य स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. संजय घोरपडे, उपनगराध्यक्ष अमित मानकरी, बालाजी वळसांगवीकर, नगरसेवक नदीम मिर्झा, महादेव मळभागे, शेख गुरुजी, अमित (बंटी) सूर्यवंशी, संजय सावरगावे, डॉ. अनिल इंगोले, आनंद जीवने, शेंडगे मामा, बाबुराव लांडगे, शिवा कांबळे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. स्पर्धेसाठी ग्रामीण भागातूनही मोठ्या प्रमाणात पैलवान सहभागी झाले होते. कुस्तीचा थरार पाहण्यासाठी देवणी आणि परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. यात्रेनिमित्त पोलीस, तहसील व नगरपंचायत प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवत कार्यक्रम सुरळीत पार पाडला. महादेव यात्रा समितीच्या नियोजनामुळे संपूर्ण कार्यक्रम यशस्वी ठरला.

# लातूरात परशुराम जयंतीची जोरदार तयारी; उत्सवात व्याख्यानमाला, रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिर, महिलांसाठी विविध उपक्रम तसेच समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन



**लातूर : वार्ताहर**

राजराजेश्वर भगवान परशुराम जन्मोत्सव सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने यंदाही उत्साहात साजरा करण्यात येणार असून हा उपक्रम आता तेराव्या वर्षात पदार्पण करत आहे. ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. संजय पांडे यांनी सुरू केलेला हा उपक्रम गेल्या बारा वर्षांपासून सातत्याने राबवला जात आहे. यंदाच्या उत्सवात व्याख्यानमाला, रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिर, महिलांसाठी विविध उपक्रम तसेच समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. भगवान परशुराम मंदिरात यज्ञयागाचाही विशेष कार्यक्रम होणार आहे. समाजातील सर्व घटकांनी वर्षातून एकदा एकत्र येत परशुराम जयंती साजरी करावी, असा समितीचा मनोदय आहे. यावर्षी प्रथमच वैद्यकीय आणि सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेले डॉ. संतोष देशपांडे यांची अध्यक्षपदी निवड झाली असून त्यांच्या नेतृत्वाखाली आणि ज्येष्ठांच्या मार्गदर्शनात मोठ्या प्रमाणावर उत्सव साजरा करण्याचे नियोजन आहे. सध्याच्या सामाजिक परिस्थितीत संघटित राहणे अत्यंत गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बैठकीत ब्राह्मण सेवा संघ, लोकमान्य टिळक विचार मंच, माध्व मंडळ (उत्तरादी मठ), लक्ष्मी नृसिंह बचत गट, समर्थ अन्न सेवा, विद्यावर्धिनी प्रतिष्ठान, परशुराम सेवा संघ, पेशवा युवा मंच, ब्राह्मण ऐक्य परिषद, BBN ग्रुप, बॉन्ड ऑर्गनायझेशन, पुरोहित संघ तसेच विविध महिला गट आणि अन्य संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीत 'अमृत योजनाफची माहिती समाजातील उद्योजकाना देण्याचे ठरले . तसेच BBN महिला व पुरुष उद्योजकांसाठी प्रदर्शन भरविणे, १०० रक्तदात्यांचा संकल्प, तरुणांचा सहभाग वाढवणे आणि सामाजिक बांधिलकी जपणारे उपक्रम राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. दरम्यान, BBN महिला मंडळाच्या वतीने आनंदाची बातमी देण्यात आली असून, लातूरमध्ये ब्राह्मवृंद परिवारासाठी विशेष शॉपिंग फेस्टिवल आयोजित करण्यात येणार आहे. या फेस्टिवलमध्ये BBN समूहातील महिला व पुरुषांना त्यांच्या व्यवसायातील उत्पादने विक्रीसाठी स्टॉल लावण्याची संधी मिळणार असून हे BBN मेंबर साठी स्टॉल पूर्णपणे मोफत असणार आहेत. स्टॉल बुकिंगसाठी अनुराधा औसेकर व धनश्री जोशी यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जागा मर्यादित असल्याने लवकर नोंदणी करण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. एकूणच, परशुराम जयंती निमित्ताने समाज एकत्र आणण्याचा आणि सामाजिक उपक्रमांना चालना देण्याचा मोठा प्रयत्न यंदा पाहायला मिळणार आहे. अशी माहिती जयंती समितीचे अध्यक्ष डॉक्टर संतोष देशपांडे यांनी दिली आहे.

# भिवंडीत ठिकठिकाणी हनुमान जयंती उत्साहात साजरी



**भिवंडी : वार्ताहर**

भिवंडीत हनुमान जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यासाठी शहरातील विविध भागातील व ग्रामीण परिसरात हनुमान मंदिरात भक्तांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. शहरातील कणेरी, ठाणगे आळी, चंदनबाग, कामतघर, नवीबस्ती नेहरूनगर या भागात मंदिरांमधून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तर मंदिराना विद्युत रोषणाई व फुलांची सजावट करण्यात आली होती. विश्व हिंदू परिषद व श्री गोपाळ गणेश दांडेकर प्रतिष्ठानच्या वतीने शहरातील नवीवस्ती शास्त्रीनगर येथे असलेल्या हनुमान मंदिर ते नवीवस्ती येथील लकडा मार्केट परिसरातील मार्कंडेय महामुनी मंदिरापर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. यावेळी हनुमान भक्तांनी भगवे झेंडे नाचवित जय श्रीराम च्या घोषणा देत हजेरी लावली होती. मुस्लिम बहुल भागातून ही मिरवणूक निघत असलेल्या या भागात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी भिवंडी पोलीस उपायुक्त शशिकांत बोराटे यांच्या नेतृत्वाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# मतदार यादी विशेष सघन पुनरीक्षण कार्यक्रम अंतर्गत मतदारांनी आपली माहिती अद्ययावत करावी -तहसीलदार




**लातूर : वार्ताहर**

भारत निवडणूक आयोग आणि मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या सूचनेनुसार, लातूर जिल्ह्यात 'विशेष सघन पुनरावलोकन' (SIR) कार्यक्रम प्रभावीपणे राबविला जात आहे. या मोहिमेतंर्गत मतदार यादीतील अस्पष्ट (ब्लअर) फोटो, डी.एस.ई., एस.आय.आर. मॅपिंग आणि नावातील दुरुस्ती ही कामे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्यामार्फत केली जात आहेत. ३१ मार्च २०२६ ही मुदत संपल्यानंतरही हे काम सध्या सुरू असून, मतदारांनी प्रशासनाला सहकार्य करणे आवश्यक असल्याचे आवाहन करण्यात आले आहे. आतापर्यंत लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे मॅपिंगचे केवळ ५७ टक्के कामकाज पूर्ण झाले आहे. ज्या मतदारांचे मॅपिंग अद्याप झालेले नाही, त्यांना बीएलओमार्फत सुनावणीसाठी बोलावले जाईल. अशा सुनावणीस दोन ते तीन वेळा अनुपस्थित राहिल्यास किंवा आवश्यक पुरावे सादर न केल्यास संबंधित मतदाराचे नाव मतदार यादीतून थेट वगळले जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे २३४-लातूर ग्रामीण आणि २३५-लातूर शहर विधानसभा मतदारसंघातील सर्व मतदारांनी आपल्या भागातील बीएलओंची प्रत्यक्ष भेट घेऊन आपली माहिती अद्ययावत करून घ्यावी. या प्रक्रियेसाठी मतदारांनी सन २००२ च्या मतदार यादीतील स्वतःचे आई, वडील, आजी किंवा आजोबा यांचा तपशील https://voters.eci.gov.in/searchInSIR/SZU-4DPDF-JKSQWODSE या अधिकृत लिंकवर किंवा 'ECINET' या पवर शोधून बीएलओ यांना उपलब्ध करून द्यावा. विवाहित महिलांनीदेखील त्यांच्या माहेरच्या (२००२ मधील) नातेवाईकांची माहिती देऊन प्रशासनास सहकार्य करावे. ही मोहीम मतदार यादी अधिक शुद्ध आणि त्रुटीरहित करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची असून, नागरिकांनी आपले नाव मतदार यादीत कायम राखण्यासाठी तत्परतेने माहिती द्यावी, असे आवाहन उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे आणि तहसीलदार सौदागर तांदळे यांनी केले आहे.

# रेल्वे अपघातात एकाचा मृत्यू

**विरार : वार्ताहर**

विरार आणि वैतरणा स्थानकादरम्यान हमसफर एक्सप्रेससमोर अचानक एक अज्ञात व्यक्ती आल्याने भीषण अपघात घडला. गुरुवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास ही घटना घडली. या दुर्घटनेत संबंधित व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला आहे. हा मृतदेह इंजिन समोरच्या जाळीत अडकल्याने एक्सप्रेसमध्येच थांबवावी लागली. त्यामुळे पश्चिम रेल्वेच्या मार्गावरील रेल्वे वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. संबधीत व्यक्ती गुरुवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास रेल्वे रूळ ओलांडून जात असताना हा अपघात घडल्याचा प्राथमिक अंदाज आहे. धडक इतकी भीषण होती की, सदर व्यक्तीचा मृतदेह इंजिनच्या गार्डला अडकला. त्यामुळे गाडी चालकाने तातडीने ब्रेक लावून गाडी थांबवली.या अपघातामुळे डहाणू आणि गुजरातकडे जाणार्या लांब पल्ल्याच्या अनेक गाड्या खोळंबल्या, तर मुंबई उपनगरीय लोकल सेवेवरही त्याचा मोठा परिणाम झाला. कामावरून घरी परतणार्या प्रवाशांचा याचा मोठा मनस्ताप सहन करावा लागला. या घटनेची माहिती मिळताच रेल्वे पोलीस आणि रेल्वे सुरक्षा दल व अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेत जाळीत अडकलेला मृतदेह बाहेर काढण्यात आला.

# मान्सूनपूर्व नाले सफाई व अतिक्रमणासंदर्भात लातूर महानगरपालिका प्रशासनाने घेतली बैठक



**लातूर : वार्ताहर**

मान्सून पूर्व नालेसफाई आणि शहराच्या चारही बाजूंनी जाणाऱ्या रिंग रोडवरील अतिक्रमणे या संदर्भात महापौर जयश्री सोनकांबळे व मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली. यावेळी उपमहापौर स्नेहल उटगे, अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, उपायुक्त वसुधा फड, वंचित बहुजन आघाडीचे गटनेते अमोल लांडगे यांचीही या बैठकीस उपस्थिती होती. आगामी पावसाळ्याच्या दृष्टिकोनातून मान्सूनपूर्व नाले सफाईचा आराखडा तयार करावा अशा सूचना या बैठकीत संबंधित विभागांना देण्यात आल्या. प्रत्येक प्रभागात हमला पद्धतीने नालेसफाई करावी. यासाठी महानगरपालिकेत आपत्कालीन कक्षाची स्थापना करावी. शहरातील नागरिकांच्या घरात पाणी शिरणार नाही, याची दक्षता घ्यावी.

धोकादायक झाडे व फांद्या तोडाव्यात. मोडकळीस आलेल्या धोकादायक इमारतींच्या ठिकाणी सूचना फलक लावावेत. रस्ते दुभाजकातील कचरा उचलून ते स्वच्छ करावेत, अशा सूचना यावेळी करण्यात आल्या. स्वच्छता विभाग व बांधकाम विभागाने मान्सूनपूर्व नाले सफाईची कामे त्वरित सुरू करण्याचे आदेश यावेळी देण्यात आले. शहराच्या बाहेरून जाणाऱ्या रिंग रोडवर अतिक्रमणे होत असल्याच्या तक्रारी येत आहेत. त्या अनुषंगाने अतिक्रमणे झाली आहेत की नाही? याचे सर्वेक्षण करून ८ दिवसात अहवाल सादर करण्याचे आदेशही या बैठकीत देण्यात आले. यावेळी मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख, स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे, क्षेत्रीय अधिकारी रवी कांबळे, संतोष लाडलापुरे, समाधान सूर्यवंशी, विजय राजुरे, मुख्य स्वच्छता निरीक्षक रवी कांबळे, धोंडीबा सोनवणे, शिवराज शिंदे, अक्रम शेख यांच्यासह सर्व १८ प्रभागांचे स्वच्छता निरीक्षक उपस्थित होते.

# लातूरच्या जिल्हाधिकारीपदी डॉ.भारत बास्टेवाड यांची नियुक्ती; श्रीम.वर्षा ठाकूर-घुगे यांची बदली

**देवणी : वार्ताहर**



महाराष्ट्र राज्य प्रशासकीय सेवेत मोठे फेरबदल करण्यात आले असून लातूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी पदी डॉ. भारत बास्टेवाड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सामान्य प्रशासन विभागाने गुरुवारी २ एप्रिल रोजी या संदर्भातील अधिकृत आदेश निर्गमित केले आहेत. डॉ. भारत बास्टेवाड हे सध्या नागपूर येथे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे (रोहयो) आयुक्त म्हणून कार्यरत होते. लातूरच्या विद्यमान जिल्हाधिकारी श्रीम. वर्षा ठाकूर-घुगे यांच्या जागी आता डॉ. बास्टेवाड जिल्ह्याची धुरा सांभाळणार आहेत. मंत्रालयातील सहसचिव सुभाष उमराणीकर यांच्या स्वाक्षरीने निघालेल्या या आदेशानुसार, डॉ. बास्टेवाड यांनी आपल्या सध्याच्या पदाचा कार्यभार सचिव (रोहयो) यांच्या सल्ल्याने अन्य अधिकाऱ्याकडे सोपवून तातडीने लातूर जिल्हाधिकारी पदाचा पदभार स्वीकारण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दरम्यान, नागपूर येथील आयुक्त पदावर दिपक सिंगला यांची नियुक्ती करण्यात आली आहे. बदली झालेल्या अधिकाऱ्यांनी नवीन पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होताना शासन निर्णयानुसार ई-ऑफिस आणि ई-एचआरएमएस प्रणालीचा वापर वाढवण्याकडे विशेष लक्ष द्यावे, अशा सूचनाही प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत. लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांची बदली झाल्याने आता नूतन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड लातूर जिल्ह्याचा कारभार कशा प्रकारे हाती घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# एसी कॉम्प्रेसरचा भीषण स्फोटात तिघांचा मृत्यू

**वाडा : वार्ताहर**

वाडा तालुक्यातील आबिटघर येथील विस्तारा कंपनीमध्ये एसी दुरुस्तीचे काम सुरू असताना कॉम्प्रेसरचा अचानक स्फोट होऊन तिघा तंत्रज्ञ कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना शुक्रवारी रात्री घडली. या प्रकरणी निष्काळजीपणामुळे मृत्यू झाल्याचा गुन्हा वाडा पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला असून तालुक्यात औद्योगिक सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या घटनेत किशन उर्फ कृष्णा भिवा निकम (६६), अखिलेश मोतीलाल जयस्वाल (४३, रा. आजमगड, उत्तर प्रदेश), मोहम्मद अली मेहमूद अली अन्सारी (३१, रा. कुर्ला पूर्व, मुंबई) अशी मृत झालेल्या कामगारांची नावे आहेत. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी, रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास अबिटघर येथील विस्तारा कंपनी येथे एसी खराब झाल्याने ठाणे येथून एका कंपनी मार्फत आलेल्या तंत्रज्ञ यांच्या मार्फत दुरुस्तीचे काम सुरू होते. सदर तंत्रज्ञ (कामगार) यांना कुठलेही तांत्रिक प्रशिक्षण तसेच आवश्यक सुरक्षा साधने उपलब्ध करून न देता धोकादायक पद्धतीने काम करण्यास लावण्यात आल्याचा आरोप फिर्यादीत केला आहे. काम सुरू असतानाच अचानकपणे एसी कॉम्प्रेसरचा जोरदार स्फोट झाला. स्फोट इतका तीव्र होता की तिघेही कामगार गंभीररीत्या भाजले गेले आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेप्रकरणी फिर्यादीनुसार, कामगारांच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष करून त्यांना धोकादायक काम करण्यास भाग पाडल्यामुळे ही दुर्घटना घडल्याचा आरोप करण्यात आला असुन आरोपी कृष्णकुमार ए. नाडर (मुंबई) यांच्याविरुद्ध वाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनास्थळी पोलिसांनी भेट देऊन पंचनामा केला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अजित साबळे करीत आहेत. अद्याप आरोपीला अटक करण्यात आलेली नसल्याची माहिती पोलिसांनी दिली. दरम्यान, इतकी मोठी दुर्घटना घडूनही प्रशासनाकडून सुरुवातीला कमालीची गुप्तता पाळण्यात आल्याची चर्चा स्थानिक स्तरावर सुरू आहे. घटनेची माहिती उशिराने समोर आल्याने प्रशासनाच्या भूमिकेबाबत संशय व्यक्त केला जात असून औद्योगिक दुर्घटनांबाबत माहिती पारदर्शकपणे जाहीर करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. वाडा औद्योगिक परिसरात वारंवार घडणाऱ्या दुर्घटनांमुळे सुरक्षा नियमांची अंमलबजावणी कितपत होते, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून कामगार सुरक्षेबाबत कठोर उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी वसई यांचे कार्यालय**
**(महसूल शाखा)**
किल्लाबंदर रोड, मालोंडे, वसई गांव, ता. वसई, जि. पालघर, पिन नं. ४०१ २०१
दुरध्वनी क्रमांक : (०२५०) २३२२००७

क्र.मशा/कक्ष-१/फौजदारी/कावि-०३/२०२६
दिनांक : ३०/०३/२०२६

**जाहीर नोटीस**

अर्ज क्रमांक : ०३/२०२६
**श्रीम. तस्लीमा हामीद शेख .... अर्जदार**
**विरुद्ध**
**१) सहा. आयुक्त**
**वसई-विरार शहर महानगरपालिका, .... सामनेवाले**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी स्वतः **श्रीम. तस्लीम हामीद शेख** ह्यांचा जन्म दिनांक ११/०७/१९७७ रोजी वासळई, वसई येथे झाला असून त्यांच्या जन्माची नोंद करण्याबाबत आदेश मिळण्याकरीता या कार्यालयात अर्ज क्रमांक ०३/२०२६ दाखल केलेला आहे. ज्या कोणी इसमास हरकत असेल त्यांनी या कार्यालयात हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत लेखी हरकत करावी. सदरहू आदेश देण्याबाबत जर कोणत्याही इसमाची हरकत दाखल न झाल्यास योग्य ते पुरावे व कागदपत्र घेवून अर्जदार यांना त्यांच्या जन्माची नोंद करण्याबाबत आदेश देण्यात येईल यांची कृपया नोंद घेण्यात यावी.

आज दिनांक ३०/०३/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली आहे.

**शिक्का**

**सही/-**
**तहसीलदार वसई करिता**

# मोबाईल रिपेरिंगचे काम करणाऱ्या तरूणाच्या घरात सापडला शस्त्रसाठा

## कल्याण पश्चिमेतील घास बाजार भागातील युसुफ हाईट्स इमारतीत टाकला छापा

**कल्याण : वार्ताहर**




मोबाईल रिपेरिंगचे काम करणाऱ्या कल्याण पश्चिमेतील घास बाजार भागातील युसुफ हाईट्स इमारतीत राहणाऱ्या एका १९ वर्षाच्या तरूणाच्या घरात बाजारपेठ पोलिसांनी शस्त्रसाठा जप्त केला. प्रतिबंधित हत्यारे जवळ बाळगली, पोलिसांच्या मनाई आदेशाचा भंग केला म्हणून बाजारपेठ पोलिसांनी या तरूणा विरूध्द गुन्हा दाखल केला आहे. युवेश हनिफ सय्यद (१९) असे या तरूणाचे नाव आहे. तो कल्याण पश्चिमेतील घास बाजारातील युसुफ हाईटस या इमारतीत कुटुंबीयांसह राहतो. बाजारपेठ पोलीस ठाण्याचे हवालदार राहुल ईशी यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी हा गुन्हा दाखल केला आहे. हवालदार राहुल ईशी यांनी तक्रारीत म्हटले आहे, की बाजारपेठ पोलीस ठाणे हद्दीत आमचे पोलीस पथक रात्रीच्या वेळेत गस्त घालत होते. त्यावेळी आमच्या पोलीस पथकातील हवालदार बी. आर. बागुल यांना घास बाजारातील युसुफ हाईट्समधील बी विंगमधील एका सदनिकेत एका इसमाने शस्त्रसाठा केला असल्याची गुप्त माहिती माहितगारातर्फे मिळाली. ही माहिती साहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत आंधळे यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेशसिंग गौड यांना दिली. मिळालेल्या माहितीप्रमाणे पोलीस पथक युसुफ हाईट्स भागात पोहचले. त्यांनी मिळालेल्या माहितीची खात्री केली. त्यानंतर पोलीस पथकाने युसुफ हाईट्समध्ये रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास छापा टाकला. मिळालेल्या माहितीप्रमाणे पोलिसांनी युसुफ हाईट्समधील सदनिकेत छापा टाकला. त्या सदनिकेचा दरवाजा बंद होता. पोलीस पथकाने दरवाजा ठोठावताच गौसिया अशिया हनिफ सय्यद (४३) या महिलेने दरवाजा उघडला. पोलिसांना पाहताच ती महिला अस्वस्थ झाली. पोलीस पथकाने त्या महिलेकडे घरात झडती घेण्याची मागणी केली. पोलीस महिला हवालदारासह घरात जाताच तेथे युवेश सय्यद हा इसम होता. पोलीस पथकाने त्याच्याकडे मिळालेल्या माहितीप्रमाणे हत्याराची माहिती विचारली. त्यावेळी त्याने आपल्याकडे सुरा, मुठीची गुप्ती, लोखंडी चाकू असल्याची माहिती दिली. ही हत्यारे त्याने पोलीस पथकाला काढून दिली. या शस्त्रसाठ्याचा पोलिसांनी पंचांच्या उपस्थितीत पंचनामा केला. तात्काळ युवेश सय्यदला पोलिसांनी ताब्यात घेतले. प्रतिबंधित शस्त्रांचा घरात बेकायदा साठा केला. तसेच, पोलिसांच्या शस्त्र प्रतिबंध मनाई आदेशाचा भंग केला म्हणून युवेश सय्यद याच्या विरूध्द बाजारपेठ पोलीस ठाण्यात पोलिसांनी गुन्हा दाखल केला. आपण मोबाईल रिपेरिंगचा व्यवसाय करतो, असे युवेशने पोलिसांना सांगितले. मोबाईल रिपेरिंगचा व्यवसाय करणाऱ्या व्यवसायिकाकडे हा शस्त्रसाठा कशासाठी करण्यात आला होता. हा साठा युवेशने कोठून आणला. या बाजुने पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत. या कारवाईत साहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत आंधळे, साहाय्यक पो.निरीक्षक अंबिका घस्ते, हवालदार बी. आर. बागुल, एम. आर. चित्ते, पी.एम. बाविस्कर, ए.बी.आंधळे सहभागी झाले होते.

# ठाण्याचे ट्रॅफिक रायडर्स बनले देवदूत

## ४६ विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाचवण्याची कामगिरी



**ठाणे : वार्ताहर**

दहावी आणि बारावीच्या परीक्षा सुरू असताना विद्यार्थ्यांना वेळेत परीक्षा केंद्रावर पोहोचवण्यासाठी ठाणे शहर वाहतूक शाखेने 'रायडर्स' उपक्रम राबवला. यामुळे तब्बल ४६ विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाचले असून त्यांच्या या कामाचे विद्यार्थी आणि पालकांकडून कौतुक होत आहे. यंदा १० फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत दहावी तसेच बारावीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा झाल्या. या काळात शाळा-महाविद्यालय परिसरात वाहतुकीचे सुयोग्य नियमन करण्यासोबतच ट्रॅफिक रायडर्सच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वेळेत परीक्षा केंद्रावर पोहचवण्यात मोलाची कामगिरी बजावण्यात आली. यासाठी ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे आणि सह पोलीस आयुक्त डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला. वाहतूक कोंडी, वाहन बिघाड, लोकल उशीर अशा अडचणींमुळे उशीर होणाऱ्या विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी शहरातील विविध भागांत ५४ रायडर्स सज्ज ठेवण्यात आले होते. विद्यार्थ्यांसाठी ट्रॅफिक कंट्रोल व्हॉटसप क्रमांक तसेच, दोन हेल्पलाईन क्रमांक उपलब्ध करून दिले होते. याशिवाय १८ वाहतूक युनिट्समध्येही संपर्काची सोय करण्यात आली होती. या सुविधेला पालक आणि विद्यार्थ्यांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळाला. बारावीची परीक्षा १० फेब्रुवारीला सुरू झाली. पहिल्याच दिवशी नियंत्रण कक्षामध्ये २५ कॉल्स आले होते. तर दुसऱ्या दिवशी एक कॉल आला. १७ फेब्रुवारी रोजी कळवा आणि नवी मुंबई एमआयडीसी परिसरात झालेल्या विविध अपघातांमुळे झालेल्या वाहतूक कोंडीत अडकलेल्या ४ विद्यार्थ्यांना रायडर्सनी वेळेत परीक्षा केंद्रावर पोहोचवले.

तसेच, ७ मार्च रोजी लोकल ट्रेन वेळेत न झाल्याने अंबरनाथचे दोन विद्यार्थी रेल्वे स्टेशनवर स्थानकावर रखडले होते. याबाबत कॉल येताच वाहतूक उपायुक्त पंकज शिरसाट यांच्या मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस आयुक्त किरण बालवडकर यांनी ट्रॅफिक रायडर्सकरवी 'ग्रीन कॉरिडॉर'सारखी व्यवस्था करत पर्यायी मार्गाने त्यांना कल्याणमधील परीक्षा केंद्रावर पोहोचवले. अशा प्रकारे १० फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत एकूण ४६ परीक्षार्थींना मदत करण्यात आली, ही बाब ठाणे वाहतूक विभागासाठी अभिमानास्पद ठरली आहे. वाहतूक पोलीस कर्मचारी, रायडर्स आणि अधिकाऱ्यांच्या या सेवाभावी कार्याचे उपायुक्त पंकज शिरसाट यांनी विशेष कौतुक केले आहे.

पान १ वरून....

### चंचल पत्नी सुधारण्यापलीकडे गेली ...

मोलमजुरी करुन नितीन आपला संसाराचा गाडा ओढत होता. बघता बघता दोघांच्या संसार वेलीवर दोन पुत्र आणी एक कन्या अशा तीन रत्नांचे आगमन झाले. सुरुवातीच्या काळात दिपाली आणि नितीन या दोघांचा संसार गुण्यागोविंदाने सुरु होता. मात्र काही वर्षातच नितीनला दिपालीच्या चारित्र्यावर संशय येण्यास सुरुवात झाली. तिचे कुणातरी पर पुरुषासोबत अनैतिक संबंध असल्याचा नितीन यास संशय येण्यास सुरुवात झाली. त्यातून दोघा पती पत्नीत वादाची ठिणगी पडू लागली. या वादाचा परिणाम असा झाला की एके दिवशी ती तिच्या लहान मुलास सोबत घेऊन अचानक माहेरी निघून गेली. घरात कुणाला काही न सांगता माहेरी निघून आलेली दिपाली तेथून देखील कुणाला न सांगता अजून कुठेतरी निघून गेली. त्यामुळे इकडे तिचा पती नितीन आणी तिकडे तिचे माहेरचे सदस्य हवालदिल झाले. त्यामुळे तिच्या माहेरच्या सदस्यांनी ती बेपत्ता झाल्याबाबत जळगाव तालुका पोलिस स्टेशनला मिसींग दाखल केली. त्यानंतर साधारण एक महिन्याने ती स्वत:हून जळगाव तालुका पोलिस स्टेशनला हजर झाली. आपण शिर्डी येथे गेल्याचे तिने पोलिसांना, माहेरच्या लोकांना आणि पती नितीन यास कथन केले. तिच्या अशा वागण्याचा आणी अचानक बेपत्ता होण्याचा नितीनला राग आला. त्यामुळे तीला घरी घेऊन जाण्यास त्याने नकार दिला. तिच्या अशा विचीत्र वागण्याचा तिच्या माहेरच्या सदस्यांना देखील राग आला. त्यांनी देखील तिला माहेरी नेण्यास नकार दिला. त्यामुळे ती तिच्या मोठ्या बहिणीच्या घराजवळच भाड्याच्या खोलीत लहान मुलाला सोबत घेऊन राहू लागली. त्यानंतर तीने दोनवेळा आपले मुक्कामाचे ठिकाण बदलले. जवळपास एक वर्षापासून ती पतीशिवाय एकटी विभक्त रहात होती. पत्नी दिपालीचे कुणाशी तरी नक्कीच प्रेम संबंध असावे असा नितीनला दाट संशय येऊ लागला. त्यामुळे तो तिची माहिती घेऊ लागला. नात्यातील एका तरुणासोबत तीचे प्रेमसंबंध असल्याची कुणकुण नितीनला लागली. आपल्या प्रेमसंबंधाची कुणकुण पती नितीनला लागल्याचे दिपालीस समजले. त्यामुळे आपली चुक मान्य करत तीने त्याच्यासोबत पुन्हा संसार करण्याची तयारी दर्शवली. झाले गेले विसरुन आपल्या तिघा मुलांचा विचार करत त्याने तिला संसार करण्यास व परत येण्यास होकार दिला. काही दिवस दिपाली त्याच्यासोबत व्यवस्थित वागली. मात्र पुन्हा काही दिवसांनी ये रे माझ्या मागल्याचा पाढा सुरु झाला. घरात कुणाला काही न सांगता ती अचानक कुठेतरी निघून गेली. पंधरा दिवसांनी ती घरी परत आली. त्यानंतर काही महिने ती व्यवस्थित राहिली. पुन्हा एके दिवशी ती अचानक कुठेतरी निघूनगेली. हैरान झालेल्या नितीनने तिचा शोध घेतला. मात्र तिचा थांगपत्ता लागला नाही. ती अचानक निघून जाते व अचानक घरी परत येते हा प्रकार नितीनला जवळपास अंगवळणी पडला होता. त्यामुळे त्याने यावेळी तिचा शोध घेतला नाही. तसेच ती बेपत्ता झाल्याप्रकरणी पोलिस स्टेशनला मिसींग सुद्धा दाखल केली नाही. एके दिवशी नितीनला त्याची पत्नी दिपालीएका नातेवाईक तरुणासोबत दुचाकीवर डबलसीट जातांना दिसली. एमआयडीसी परिसरात त्याने तिचा आणि त्या तरुणाचा पाठलाग सुरु केला. दिपालीचा पती नितीन आपला पाठलाग करत असल्याचे बघून तो तरुण तिला तेथेच सोडून पळून जाण्यात यशस्वी झाला. मात्र हाती आलेल्या दिपालीस त्याने जागेवरच चापटा बुक्क्यांनी मारहाण केली. घटनास्थळी जमलेल्या काही महिलांनी तिची सोडवा सोडव केली. दिपालीस नितीन सोबत जावू दिल्यास तो तिला अजून मारहाण करु शकतो अशी शक्यता गृहीत धरुन त्या महिलांनी तिला त्याच्यासोबत जावू दिले नाही. अशा प्रकारे दिपालीच्या चारित्र्याविषयी नितीनच्या मनात शंका निर्माण झाली होती. दिपाली व तो नातेवाईक तरुण हे दोघे जळगाव शहरात सोबत रहात असल्याची माहिती नितीनला एका नातेवाईकाच्या माध्यमातून समजली. त्या माहितीची खात्री करण्यासाठी नितीन त्या ठिकाणी गेला. मात्र नितीन आपल्या मागावर असल्याची कुणकुण लागताच तो तरुण यावेळी देखील तेथून पळून जाण्यात यशस्वी झाला. मात्र दिपाली त्याच्या हाती लागली. त्यामुळे तो तिला घेऊन जळगाव तालुका पोलिस स्टेशनला आला. माझी पत्नी माझ्यासोबत रहात नाही, माझ्यासोबत संसार करत नाही. त्यामुळे मला तिच्यापासून घटस्फोट हवा असल्याचे त्याने पोलिसांना सांगितले. घटस्फोटासाठी न्यायालयात जावे लागेल असे त्याला पोलिसांकडून सांगण्यात आले. मात्र मी यापुढे असे वागणार नाही असे म्हणत ती नितीनसोबत घरी येण्यास तयार झाली. आपल्या तिन मुलांचा विचार करत नितीनने तिला निमखेडी येथे घरी आणले. आपल्या तिन मुलांचा विचार करत नितीनने दिपालीसोबत नव्याने संसार सुरु केला. मात्र ती त्या तरुणासोबत काढलेले फोटो सोशल मिडीया प्लॅटफॉर्मवर ठेवत असल्याचे नितीनला समजले. त्याचा नितीनला राग आला. एके दिवशी मध्यरात्री नितीनला अचानक जाग आली. त्यावेळी तो तरुण घराचा दरवाजा उघडून दिपालीला भेटण्यास येत असल्याचे नितीनच्या नजरेस पडला. नितीनने त्याला पकडण्याचा प्रयत्न केला. नितीनने त्याच्या दिशेने विट फेकून मारली. मात्र यावेळी देखील तो मोटार सायकलने पळून जाण्यात यशस्वी झाला.

दिपाली आपल्यासोबत रहात असली तरी अद्यापही तिचे मन त्या तरुणात गुंतले असल्याचे नितीनच्या लक्षात आले होते. त्यामुळे त्याच्या मनात दिपालीविषयी चिड होती. दिनांक १९ मार्च रोजी सकाळी याच विषयावरुन दोघा पती पत्नीत सकाळी वादाची ठिणगी पडली. हा वाद त्यावेळी तात्पुरत्या स्वरुपात कसाबसा मिटला. दुपारी पुन्हा दोघात याच कारणावरुन वादाला सुरुवात झाली. केवळ आपल्या तिघा मुलांच्या भवितव्याचा विचार करुन नितीन तिच्यासोबत संसार करण्यास तयार होता. मात्र दिपालीच्या वागण्यात त्याला बदल दिसून येत नव्हता. दिनांक १९ मार्चच्या सकाळपासूनच नितीन आणि दिपाली यांच्यात वादाला सुरुवात झाली. या दिवशी दोघातील वाद काही केल्या शमण्याची चिन्हे दिसत नव्हती. दिपाली व त्या तरुणाच्या प्रेमसंबंधाचा संशय नितीनला स्वस्थ बसू देत नव्हता. दुपारी तिन वाजता वाद झाल्यानंतर दिपाली झोपी गेली. दिपाली झोपली असली तरी नितीन अस्वस्थ होता. भर दुपारी साडे तीन ते चार वाजेच्या दरम्यान नितीन मनातून अशांत होता. मनातून अशांत आणि अस्वस्थ नितीनने सिमेंटची वीट हातात घेतली. त्याने पत्नी दिपालीचे तोंड दाबून तिच्या डोक्यात सिमेंटच्या विटेचा जोरदार हल्ला केला. त्यामुळे ती गंभीर जखमी झाली. तिच्या डोक्यातून रक्त वाहू लागले. तिची हालचाल मंदावली. ती मरण पावल्याचे समजून तो घरुन थेट जळगाव तालुका पोलिस स्टेशनला या घटनेची माहिती देण्यासाठी निघाला. घराबाहेर पडल्यानंतर त्याला त्याच्या मोबाईलची आठवण झाली. मोबाईल घरीच विसरल्याची त्याला जाणीव झाली. मोबाईल घेण्यासाठी तो पुन्हा घरी गेला. घरी गेल्यावर दिपाली काही प्रमाणात हालचाल करत असल्याचे त्याच्या लक्षात आले. त्यामुळे त्याचा संताप पुन्हा उफाळून आला. त्यामुळे घरात पडलेला विळा उचलून त्याने तिच्या गळ्यावर आणि पोटात प्राणघातक हल्ला केला.आता दिपालीची हालचाल कायमची बंद झाली होती.

त्यानंतर मोबाईल ताब्यात घेत त्याने तडक जळगाव तालुका पोलिस स्टेशन गाठले. आपण आपल्या पत्नीचा खून केल्याचे त्याने कर्तव्यावरील पोलिसांना कथन केले. या घटनेची माहिती समजताच उपस्थित पोलिस देखील काही वेळासाठी अवाक झाले. पोलिस निरीक्षक शशिकांत पाटील यांच्यासह त्यांचे सहकारी लागलीच घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळी भयावह चित्र सर्वांना दिसून आले. दिपाली रक्ताच्या थारोळ्यात पडलेली होती. तिच्या डोक्यावर, गळ्यावर आणि पोटावर हल्ला झालेला होता. तिच्या डोक्यावर सिमेंटच्या विटेचा तसेच पोटावर आणी गळ्यावर विळ्याचा हल्ला झाल्याचे दिसून आले. दिपालीच्या मृतदेहाच्या जवळच एक लोखंडी विळा आणि दोन सिमेंटच्या विटांचे तुकडे पडलेले होते.

पोलिस अंमलदार धनराज पाटील यांनी या घटनेची माहिती मयत दिपालीचा भाऊ जयेश ठाकरे याला फोनद्वारे दिली. माहिती मिळताच मयत दिपालीचा भाऊ जयेश ठाकरे याने काही नातेवाईकांसह निमखेडी येथील घटनास्थळ असलेले दिपालीचे घर गाठले. घटनास्थळावरील कायदेशीर सोपस्कार आटोपल्यानंतर दिपालीचा मृतदेह उत्तरीय तपासणीकामी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात रवाना करण्यात आला. तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिपालीस मयत घोषित केले. त्यानंतर जयेश पांडुरंग ठाकरे याने दिलेल्या फिर्यादीनुसार जळगाव तालुका पोलिस स्टेशनला नितीन कोळी (सोनवणे) याच्याविरुद्ध पत्नी दिपालीचा चारित्र्यावर संशय घेत खून केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिस निरीक्षक शशिकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक अनंत अहिरे, हे.कॉ. प्रदीप राजपूत, धनराज पाटील गुलाब माळी, पोलिस नाईक कैलास इंगळे, ज्ञानेश्वर कोळी, विजय निकम, पो.कॉ. प्रशांत पाटील व गणेश पाटील आदी पुढील तपास करत आहेत.

पान ८ वरून....

### सेवानिवृत्त पोउपनि अनिल स्वामी यांचा...

घेता आला. पोलीस खात्यातील तत्वाशी प्रामाणीक राहून पोलीस आणि जनता यांच्यातील दुवा साधण्याचा प्रयत्न केला. आगामी काळात दक्षीणगंगा गोदावरी तीर्थक्षेत्र आणि वारकरी संप्रदायाचा विचार तरुण पिढीमध्ये रुजविण्याचे कार्य करण्याचा मानस त्यांनी व्यवत केला.

यावेळी लातूर मनपाचे माजी स्थायी सभापती तथा विद्यमान नगरसेवक भाजपा गटनेते ॲड मठपती, ज्येष्ठ पत्रकार पंकज जैस्वाल, व्हॉईस ऑफ मिडियाचे जिल्हाध्यक्ष काकासाहेब घुटे यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी दक्षीणगंगा देवस्थान येथील ह.भ.प. मारुती महाराज कदम पाटील (रा.भायेगव ता.उमरी, जि.नांदेड), ह.भ.प. अशोक महाराज पाटील (रा.आंतरगाव ता.नायगाव जि.नांदेड), ह.भ.प. आसाराम महाराज घाटुळ (रा.मंगरूक ता.माजलगाव जिं. बीड), कोईम्बतूर येथील सीआरपीएफचे असिस्टंट कमांडन्ट सुमीत मस्के, आबासाहेब आगळे, अभिषेक मुदकन्ना, कृष्णा येडेकर आदींनीही पोलीस उपनिरिक्षक अनिल स्वामी यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन पोलीस कल्याण निधीचे श्री. अभंगे यांनी केले. यावेळी सेवानिवृत्त पोलिस अधिकारी व कर्माचाऱ्यांच्या कुटुंबियांसह नातेवाईक, मित्र, आप्तेष्ठांची मोठी उपस्थिती होती. पोलीस अधिक्षक अमोल तांबे, अप्पर पोलिस अधिक्षक मंगेश चव्हाण यांनी सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी व त्यांच्या सोबत आलेल्या आप्तेष्ठांचे आस्थेवाईक स्वागत करीत प्रत्यक्ष शुभेच्छा दिल्या. समाजाच्या हितासाठी कार्यरत रहावे. आपल्या ज्ञानाचा उपयोग उपेक्षीत घटकांसाठी द्यावा असे मार्गदर्शन त्यांनी केले.

### विरारमध्ये ट्रॅफिक व फेरीवाल्यांच्या...

स्थानिक रहिवाशांनी बाहेरील भागांतून येणारे विक्रेते येथे व्यवसाय करून ट्रॅफिक कोंडी वाढवत असल्याचे नमूद केले. त्यामुळे कारवाई करताना स्थानिक नागरिकांच्या हिताचा विचार करावा, अशी मागणी त्यांनी प्रशासनाकडे केली. ऑटो युनियनचे प्रतिनिधी पप्पू गुप्ता यांनी ट्रॅफिक नियमांचे उल्लंघन आणि मनपाची निष्क्रियता ही समस्या वाढण्यामागची प्रमुख कारणे असल्याचे सांगितले. तर उदय जाधव यांनी साईनाथनगर, चंदनसार, आरजे सिग्नल, जीवदानी रोड, मनवेल पाडा आणि साईबाबा मंदिर रोड या संवेदनशील भागांमध्ये नियमित पोलीस गस्त वाढवण्याची मागणी केली. यावर वरिष्ठ पोलीस निरीक्षक एल. एम. तुरे यांनी सांगितले की, सर्वप्रथम मनपा, महापौर आणि संबंधित विभागांनी फेरीवाल्यांसाठी अधिकृत जागा उपलब्ध करून द्यावी. त्यानंतर पोलीस प्रशासन अवैध व्यवसायांवर कठोर कारवाई करेल आणि नियमभंग करणाऱ्यांना कोणतीही सवलत दिली जाणार नाही. या बैठकीला ॲडव्होकेट महेश कदम, रामशंकर यादव, रफीक शेख, संदीप होडगे, निखिल पाटील, जितेंद्र खाडे आदी मान्यवर उपस्थित होते. पोलीस प्रशासनाने सर्व सूचनांचा गांभीर्याने विचार करून आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

### जिल्हास्तरीय शिक्षण आरोग्य व महिला...

सेवा व शिफारस देण्याचे केंद्र न करता अशा ठिकाणी येणाऱ्या रुग्णांची परिस्थिती व जोखीम लक्षात घेऊन निर्णय घेणे आवश्यक असल्याचे सांगितले. जिल्ह्यातील काही प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये राज्यातील सर्वाधिक प्रसुती नोंदवण्यात आले असताना काही ठिकाणी नकळत दुर्लक्ष होत असल्याने किंवा एखादी चूक होत असल्याने रुग्ण दगावल्यास संबंधित विषयाला ठळकपणे प्रसिद्धी मिळून जिल्ह्याची नाहक बदनामी होत असल्याकडे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कर्मचाऱ्यांचे लक्ष वेधले. गावाच्या विकासात असणाऱ्या त्रुटी लक्षात घेऊन त्या सुधारण्यासाठी आवश्यक उपाययोजना आखण्यासाठी व शासकीय योजनांच्या पूर्ततेसाठी जिल्हा परिषदेच्या विविध विभागाने एकत्रित काम करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्हा परिषदेत मार्फत होणाऱ्या कामांमध्ये कोणत्या चुका होतात याबाबत कर्मचाऱ्यांनी आत्मपरीक्षण करण्याची गरज असल्याचे त्यांनी आवाहन केले. बालकांच्या पहिल्या हजार दिवसां दरम्यानच्या आरोग्य देखरेखी सोबत अठरा वर्षांच्या किशोरवयीन मुलींमध्ये त्यांचे रूपांतर होईपर्यंत जिल्हा प्रशासन काळजी घेत असून आरोग्य विभागात चांगले काम झाल्याने निकषांची पूर्तता झाल्याने अनेक मानांकन प्राप्त झाल्याकडे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे यांनी लक्ष वेधले. पालघर जिल्हा अधिक आरोग्यदायी व बलवान करण्यासाठी जिल्हा परिषदे च्या कर्मचाऱ्यांचा मोठा वाटा असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी सोनाली मातेकर, डॉ. संतोष चौधरी, डॉ. श्रीकांत कुलकर्णी, डॉ. वैदेही माळवी आदी मान्यवरांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. एमएसडी व वायफोरडी फाउंडेशन तर्फे स्वास्थक्षम योजनेअंतर्गत आरोग्य सेवकांना माता बाल संगोपन सार्वजनिक आरोग्य, कर्करोग निदान लसीकरण व उपचार पद्धतीचे उजळणी प्रशिक्षण पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांना पुरस्कार व प्रशस्तीपत्रक मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले.

जिल्ह्यातील अंगणवाड्यांचे नव्याने बांधकाम करण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला असून पुढील दोन वर्षात जिल्ह्यातील सर्व अंगणवाड्यांची दुरुस्ती चे काम पूर्ण होईल असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले. जिल्ह्यात असणाऱ्या सोयी सुविधांचा स्तर उंचावत असताना विकल्प विपरीत अंतर्गत जिल्हा बाहेर बदली करून गेलेल्या ७५० शिक्षकांपैकी ६० शिक्षक यांनी पुन्हा पालघर जिल्हा परिषदेकडे अर्ज करून जिल्ह्यात सेवा वर्ग करून घेतली असल्याने जिल्हा प्रगतीपथावर असल्याचे हे द्योतक असल्याचे मनोज रानडे यांनी प्रतिपादन केले.

### पालघर जिल्हा प्रशासन व श्रमजीवी...

सुरेश रेंजड, प्रभारी जिल्हा सचिव कैलास तुंबडा, जिल्हा महिला प्रमुख रेखा पऱ्हाड आणि जिल्हा उपाध्यक्ष अंकुश वड, मोखाडा तालुका निरीक्षक रघु चौधरी, जिल्हा उपाध्यक्ष लक्ष्मण पडवळे, विक्रमगड तालुका अध्यक्ष मंगेश काळे, तलासरी तालुका अध्यक्ष सुरक्षा रायात, वसई शहर तालुका अध्यक्ष नारायण विघ्ने, डहाणू तालुका अध्यक्ष हरिश्चंद्र उंबरकर, वाडा तालुका सचिव सुरज दळवी, पालघर तालुका कार्यालयीन सचिव शंकर वरखंडे उपस्थित होते.

### 'ईस्टर संडे' निमित्त पवित्र नाम देवालय...

यांचे सहकार्य लाभले. यावेळी रेव्ह. अशोक कॅप, रेव्ह.जयंत गायकवाड, रेव्ह.जयप्रकाश आढाव, विशाल पाटोळे, तेजस हिंगे, निखिल टाकळकर, साहिल येवलेकर, हर्षल आव्हाड, तेजस मुदलियार, प्रतीक परोल, रीची थोरात, उदय राठोड, स्टीन नवगिरे, शलमोन सूर्यवंशी, जया पाटोळे, शारोन साळवी, नमन सूर्यवंशी, गौरव अमोलिक, अर्पण उमापती, सुशांत जाधव, ऑल्विन साळवी हे सहभागी होते.

### वसई किल्ल्यातील पोर्तुगीजकालीन ...

संवर्धन इत्यादी विषयावर राऊत यांनी मोकळेपणाने संवाद साधला. आजच्या विनामूल्य प्रवेश मोहिमेत उपस्थितांनी किल्ल्यातील न्यायालय, हॉस्पिटल, नगरपालिका, बालेकिल्ला, श्री वज्रेश्वरी देवी मंदिर परिसर इत्यादी अवशेषांचाही इतिहास जाणून घेतला. कोळी एकता मंच समूहाच्या अंतर्गत नियमितपणे दरवर्षी या मार्गदर्शन उपक्रमाचे आयोजन करण्यात येत असते.

सद्याच्या उन्हाचा वाढता तडाखा लक्षात घेता कार्यक्रमात लाभलेली स्थानिक उपस्थिती उल्लेखनीय होती. कार्यक्रमाची सुरुवात संत पिटर चर्च कोळीवाडा पॅरिशचे सहाय्यक धर्मगुरू फादर थॉमस अल्फान्सो यांनी केली. कार्यक्रमासाठी उपस्थित भाविक गण, संत पिटर प्रार्थना संघ, इतिहासतज्ञ व लेखक श्रीदत्त राऊत, फादर थॉमस अल्फान्सो, कोळी एकता मंच सदस्य आग्नेल दरोग्या, आनंद मस्तान, कोळी एकता मंच अध्यक्ष नाझरेथ मानकर, कोळी चॅरिटेबल ट्रस्ट अध्यक्ष पिटर तुलो इत्यादींनी सहभाग दर्शविला. स्थानिक भाविक मंडळींनी विविध गीते व शुभ वचने संदेश यांचे पठन सादर केले. संपूर्ण विनामूल्य उपक्रमात राऊत यांनी किल्ला संवर्धनासाठी आवश्यकता व प्रबोधन यावर विशेष मार्गदर्शन केले. आगामी काळात किल्ल्यातील अगुस्तीयन ख्रिस्तमंदिर, पाण्याच्या विहिरीची आवश्यक स्वच्छता याबाबत होणारी श्रमदान मोहीम जाहीर करण्यात आली. कोळी एकता मंचाचे प्रतिनिधी नमस्कार सर नाझरेथ मानकर यांच्या मते दरवर्षी किल्ल्यातील ऐतिहासिक ख्रिस्तमंदिरात प्रार्थना आयोजित करण्यात येतात. ऐतिहासिक वास्तूंच्या इतिहासाचे ज्ञान व स्थानिक लोकांना असलेली चिकित्सा या अभ्यासपूर्ण, श्रध्दापूर्ण वातावरणात पूर्ण झाल्याचा आनंद आहे. किल्ल्यातील वास्तू बोलक्या झाल्या. आगामी काळात संवर्धनासाठी नक्की तत्परतेने सहभागी होऊ.

### निर्भय बनो आंदोलनास 'निर्भय पुरस्कार'...

मेहनत व सुंदर आयोजन नियोजनातून कार्यकर्त्यांची समाजाप्रती असलेली कळकळ अधोरेखित झाली. निर्भय जनसंस्थेच्या या उपक्रमामुळे समाजात सकारात्मक विचारांची जागृती होऊन निर्भयतेची भावना अधिक बळकट होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

06 TO 12 APRIL 2026 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 4/5/2026 7:53 PM Page 1



# कासार सिरसी पोलिसांच्या हप्तेखोरीमुळे नागरिकांचा जीव धोक्यात






**देवणी : शकील मनियार**

गेल्या आठवड्यात निलंगा तालुक्यातील कासार सीरसी पोलिस ठाण्या अंतर्गत बेकायदा चालवत असलेल्या आंध्र प्रदेशातील रामण्णा यांच्या ब्रिक यार्ड सपोर्ट क्लब विषयी 'क्राईम संध्या' या वृत्तपत्रात बातमी प्रकाशित करण्यात आली होती. या बातमीत ब्रीक यार्ड क्लब हा बेकायदा चालवला जात असून, सदरील क्लब मध्ये चुकीच्या पद्धतीने खेळ खेळले जात आहेत. खेळायला जाणाऱ्या नागरिकांची फसवणूक केली जात आहे. हा क्लब डे-नाईट चालू असतो. याठिकाणी भांडणं तंटे वाढत असून, तरुण रात्री बेरात्री घराबाहेर पडत आहेत व घरी बायका पोरांना मारझोडीचा प्रकार होत आहे. पुढे चालून चोरी व दरोड्यासारख्या घटना घडतील याला कासार सिरसी पोलिस स्टेशनचे ठाणेदार जबाबदार राहतील अश्या प्रकारची बातमी 'क्राईम संध्या'ने गत आठवड्यात प्रकाशित केली होती व लागलीच दुसऱ्याच दिवशी दरोडा पडल्याने बातमीचा अंदाज खरा ठरला?

कासार सिरसी पोलिसांच्या हप्तेखोरी मुळे कायदा सुव्यवस्थेचे धिंडवडे निघाले आहेत, तर तांबाळा क्लबवर झालेल्या शस्त्रधारी दरोड्या मुळे नागरिकांचे जीव धोक्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार क्लबमध्ये सुरू असलेल्या संशयास्पद हलचालिकडे स्थानिक पोलिसांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. हप्तेखोरीमुळेच अशा बेकायदेशीर धंद्यांना खतपाणी घातले जाते असा संतप्त सुर परिसरातून उमटत आहे. सर्वात गंभीर बाब म्हणजे ब्रिक यार्ड या क्लबला देण्यात आलेल्या परवाण्याबाबत अनेक शंका उपस्थित झाल्या आहेत. क्लबला नेमकी किती टेबलची परवानगी देण्यात आली होती. प्रत्येक्षात मात्र किती टेबल सुरू होते. दररोज येथे येणाऱ्या लोंकाची नोंद ठेवली जात होती का? त्यांच्या ओळखीची तपासणी करण्यात येत होती का? या सर्व प्रश्नाचे उत्तरे अद्याप धूसरच आहेत. स्थानिक रहिवाशांच्या मते, क्लबवर रोज मोठ्या प्रमाणात गर्दी होत होती. मात्र कोणतीही सुरक्षा व्यवस्था नव्हती, बाहेरून येणाऱ्या संशयित व्यक्तीवर नियंत्रण ठेवण्यात पूर्णपणे अपयश आले आहे. त्यामुळेच दरोडे खोरांना मोकळे रान मिळाले अशी चर्चा रंगत आहे. तांबाळा क्लब प्रकरणामुळे एक गोष्ट स्पष्ट झाली आहे. शहरातील कायदा सुव्यवस्था केवळ कागदावरच राहिली आहे. प्रत्येक्षात मात्र नागरिकांचा जीव धोक्यात आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे. अन्यथा अशा घटना पुन्हा घडल्यास त्याची पूर्ण जबाबदारी प्रशासनावरच राहील असा इशारा नागरिकांनी दिला आहे. आता नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक शहाजी उमाप हे काय कार्यवाही करतात याकडे जनतेचे लक्ष लागले आहे हे मात्र नक्की?

घडलेली घटना अशी की, लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यातील कासार सीरसी पोलिस ठाण्या हद्दीत तांबाळा येथील ब्रिक यार्ड सपोर्ट क्लब मध्ये दिनांक ३० मार्च २०२६ रोजी सायंकाळी अंदाजे ९ वाजता दारोड्या ची गंभीर घटना घडतील घडली याप्रकरणी कासार सिरसी पोलिस ठाण्यात गु.र.न, ५५/२०२६ कलम ३१० (२) ३११ भारतीय न्याय संहिता व सहकलम ३/२५ भा.ह.का.अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारी नुसार सहा अनोळखी व्यक्तींनी क्लब मध्ये घुसून बंदुकीचा धाक दाखवत रोख रक्कम व मोबाईल फोन जबरदस्तीने हिसकावून घेत शस्त्र दरोडा घातला. घटनेची माहिती पोलिस स्टेशन कासार सिरसी यांना रात्री १० वाजताच्या सुमारास माहिती मिळताच सदर बाब तात्काळ वरीष्ठ अधिकारी यांना कळविण्यात आली. पोलिस अधीक्षक अमोल तांबे यांच्या निर्देशानुसार व अप्पर पोलिस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदरशनाखाली कासार सिरसी पोलिस ठाण्याच्या पथकाने तात्काळ परीसरात नाका बंदी करून आरोपीचा शोध सुरू केला व तसेच पोलिस स्टेशन औराद शहाजनी, किल्लारी, निलंगा, औसा, उमरगा पोलिस स्टेशन बसवकल्यान राज्य कर्नाटक या पोलिस स्टेशन सी तात्काळ संपर्क साधून घडलेल्या घटनेची माहिती देऊन नाकाबंदी करणे बाबत माहिती दिली. दरम्यान दरोड्यात वापरण्यात आलेली संशयित विना नंबर इनोहा गाडी शिराढोण कडे पळून जात असल्याची पोलिसांना माहिती मिळाली. पोलिसांनी तत्काळ पाठलाग करून शिराढोण पाटी नाकाबंदी पॉइंटवर वाहन ३१ मार्च २०२६ च्या मध्यरात्री १२ वाजताच्या सुमारास अडविले त्यावेळी वाहनातून उतरून अंधाराचा फायदा घेऊन पळून जाण्याचा प्रयत्न करीत असताना पोलिसांनी एकास शिताफीने ताब्यात घेण्यात आलेल्याचे नाव कार्तिक कल्लाप्पा भोकले वय (२७) वर्ष राहनार भुसनी वाडी तालुका उमरगा जिल्हा धाराशिव असे असून त्याने आपल्या पाच साथीदारासह सदर दरोड्यात सहभागी असल्याची कबुली दिली आहे. परंतु मुख्य आरोपी अद्याप फरार असल्याचे तपास अधिकारी प्रताप गर्जे यांनी 'क्राईम संध्या'शी ब्रह्मणध्वनी वरून बोलताना सांगितले. आरोपीच्या ताब्यातून वाहन, मोबाईल फोन तसेच दरोड्यात वापरण्यात आलेले साहित्य जप्त करण्यात आले आहे. तपास ए.पी.आय.प्रताप गर्जे हे करीत आहेत.

# भिवंडीत बांधकाम व्यवसायिकेच्या विरोधात शेतकऱ्यांचे तीव्र आंदोलन




**भिवंडी : वार्ताहर**

भिवंडी तालुक्यातील मौजे पिंपळनेर येथील खाजगी व सरकारी जमीन सर्व्हे नंबर ६५ या जमिनींवर भूमी वर्ल्ड या विकासक संस्थेचे मालक प्रकाश पटेल याने अतिक्रमण करून बांधकाम केले आहे. सदरचे बांधकाम निकषित करण्यात यावे यासाठी शेतकरी गेली दोन तीन वर्षांपासून लढा देत आहेत.पण आज पर्यंत या बांधकामावर कोणतीही कारवाई न केल्याने शासकीय प्रशासन बांधकाम व्यवसायिकास पाठीशी घालत असून न्यायालयीन आदेशाची पायमल्ली करण्यात येत असल्याचा आरोप करीत स्थानिक शेतकऱ्यांनी गुरुवारी (२) रोजी भिवंडी येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर निदर्शने केली. एमएमआरडीए परिक्षेत्रातील मौजे पिंपळास सजा गोवे येथील स.नं. ६५, हि.नं. २८ या जमिनीची दोन वेळा शासकीय मोजणी होऊन जमिनीची हद्द कायम केलेली आहे. या जमिनी बाबत भिवंडी दिवाणी न्यायालयाने जैसे थे आदेश दिले आहेत असे असतानाही तेथील भूमी वर्ल्ड या बांधकाम व्यावसायिक संस्थेचे प्रकाश पटेल हे न्यायालयाच्या या आदेशाचे पालन न करता या जागेवर अतिक्रमण करीत असल्याचा आरोप करीत येथील शेतकऱ्यांच्या जमिनीवर जाणारे शासकीय रस्ते अडवून शेतकऱ्यांच्या जमिनी हडप करण्याचा डाव टाकला जात असल्याचा आरोप अनिता चौधरी या शेतकरी महिलेने केला आहे.

# श्री अष्ट सिद्धी हनुमान मंदिरात हनुमान जन्मोत्सव उत्साहात साजरा

**पुणे : शंकर जोग**

साचापीर स्ट्रीट कॅम्प येथील श्री वैष्णव बनिया संस्थानच्या श्री अष्ट सिद्धी हनुमान मंदिरामध्ये श्री हनुमान जन्मोत्सव उत्साहात साजरी करण्यात आली. मंदिराभोवती आकर्षण फुलांची सजावट करण्यात आली होती. यावेळी मंदिरामध्ये विविध धार्मिक कार्यक्रम झाले सकाळी होम, हवन, हनुमान चालीसा पठण, रुद्रअभिषेक, महाआरती, व भक्तांना महाप्रसाद वाटप करण्यात आले होते. यावेळी मंदिराचे अध्यक्ष श्याम राजोरे, विश्वस्त आशिष राजोरे, सुशील खंडेलवाल, किशोर सिंगवी, विकास भांबुरे, श्याम सहानी, रवींद्र भंडारी, विशाल शहा, मॉरिश श्रॉफ आदी उपस्थित होते.



# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंतीनिमित्त ९० फुटी लांबीचे होर्डिंग लावून अभिवादन!



**भिवंडी : वार्ताहर**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या येत्या १४ एप्रिल रोजी साजऱ्या केल्या जाणाऱ्या १३५ व्या जयंती निमित्त भीमभक्तांकडून आता पासूनच जय्यत तयारी सुरू केली आहे.भिवंडी शहरा नजीकच्या तालुक्यातील शेलार ग्रामपंचायत हद्दीत आम्ही शेलारकर यांच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन चरित्रावर आधारित सामाजिक राजकीय कार्याचा उल्लेख असलेल्या ९० फूट लांबीच्या होर्डिंगचे अनावरण आमदार महेश चौघुले यांच्या शुभहस्ते ढोल ताशाच्या गजरात मोठ्या जल्लोषात फटाक्यांची आतषबाजी करीत या होर्डिंगचे अनावरण करण्यात आले.या अनावरण सोहळ्यास मोठ्या संख्येने भीम अनुयायी तसेच आम्ही शेलारकर मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# गॅस सिलिंडर न मिळाल्यामुळे त्रस्त नागरिकांचे राष्ट्रीय महामार्गावर आंदोलन

**वसई : वार्ताहर**

वसई विरार शहरातील गॅस पुरवठा विलंबाने होत असल्याने त्रस्त नागरिक आता चक्क रस्त्यावर उतरले आहेत. सिलिंडर मिळावा म्हणून तुंगारफाटा परिसरातील नागरिकांनी महामार्गावरील गॅस सिलेंडरचा पुरवठा करणारी वाहने अडवून धरत चक्काजाम केल्याचा व्हिडिओ सध्या व्हायरल होत आहे. इराण इजराइल आणि अमेरिका या देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे जगभरातील इंधनपुरवठा विस्कळीत झाला आहे या युद्धाचा थेट परिणाम देशातील एलपीजी गॅस पुरवठ्यावर झाला आहे. त्यामुळे गॅस सिलिंडरच्या किंमती गगनाला भिडल्या असून एलपीजी गॅस सिलेंडरच्या अचानक वाढलेल्या मागणीमुळे गॅस सिलिंडर पुरवठ्याचे वेळापत्रकही कोलमडून गेले आहे. वसई विरार शहरातही आता या गॅस टंचाईचे पडसाद उमटू लागले आहेत. सोमवारी नालासोपारा येथील संतोषभुवन परिसरात गॅस सिलेंडर वितरणावरून नागरिकांनी गोंधळ घातल्याची घटना समोर आली असताना तसाच काहीसा प्रकार वसईतही घडला आहे. शुक्रवारी, २७ मार्च रोजी दुपारच्या सुमारास तुंगारफाटा या महामार्गाला जोडणाऱ्या रस्त्यावर असणाऱ्या एका पेट्रोल पंपाजवळ नागरिकांनी एकत्र येत रस्ता अडवून धरला होता. यावेळी गॅस सिलिंडरची वाहतूक करणाऱ्या काही वाहनांना देखील नागरिकांनी रोखून ठेवले होते. या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर वायरल होत असून त्यात मोठ्या संख्येने नागरिक रस्त्यावर उतरल्याचे दिसून येत आहेत. तसेच गॅस पुरवठ्याबाबत ते घोषणाबाजी करतानासुद्धा या व्हिडिओ दिसत आहेत. नागरिकांनी गॅस साठी पुकारलेल्या या रास्ता रोकोमुळे काहीकाळ तुंगारफाटा परिसर आणि महामार्गावर तणावती वातावरण निर्माण झाले होते. तसेच बराच वेळ अवजड वाहने महामार्गावर रोखून ठेवल्यामुळे वाहतूक ठप्प झाली होती. यामुळे रस्त्यावर भर दुपारी लांबच लांब वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. तर नोंदणी करूनसुद्धा वेळेवर गॅस सिलिंडर मिळत नसल्याने संतप्त नागरिकांनी रस्त्यावर उतरून निषेध नोंदवला असल्याचे बोलले जात आहे.



## विक्रमगड शहरातील ७० वर्षांचे वैभव आता पुन्हा उजळणार

# संतोषी माता मंदिराचा होणार कायापालट

**वाडा : वार्ताहर**

विक्रमगड शहरातील वाढत्या सिमेंटच्या जंगलात आणि गजबजलेल्या इमारतींच्या गर्दीत आपले अस्तित्व टिकवून असलेले ७० वर्षे जुने 'संतोषी माता मंदिर' आता कात टाकणार आहे. अनेक वर्षापासून दुर्लक्षित आणि दुरावस्थेत असलेल्या या ऐतिहासिक देवस्थानचा जीर्णोद्धार करण्याचा संकल्प शिवसेना (उबाठा) पक्षातील प्रमुख पदाधिकारी, जेष्ठ शिवसैनिक, महिला आघाडी, युवासेना यांनी सोडला असून, लवकरच या मंदिराला त्याचे जुने वैभव प्राप्त करून दिले जाणार आहे.

इतिहासाची साक्ष आणि सद्यस्थिती : शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या या मंदिराची स्थापना सात दशकांपूर्वी झाली होती. एकेकाळी भाविकांच्या गर्दीने फुलून जाणारे हे मंदिर आजूबाजूला उभ्या राहिलेल्या उंच इमारतींच्या विळख्यात अडकले आहे. देखभालीअभावी मंदिराच्या भिंतींना तडे गेले असून, छताची पडझड झाली आहे. पावसाळ्यात होणारी गळती आणि परिसरातील अस्वच्छता यामुळे मंदिराच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला होता. मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी शिवसेना (उबाठा) पक्षातर्फे बाळासाहेब ठाकरेंच्या जन्मशताब्दी वर्षाचं औचित्य साधून मंदिराच्या गाभाऱ्याचे सुशोभीकरण, मुख्य मूर्तीचे पावित्र्य राखून गाभाऱ्याचे नूतनीकरण, मंदिराभोवती आकर्षक विद्युत रोषणाई आणि भाविकांसाठी बसण्याची व्यवस्था केली जाणार आहे. हे मंदिर आमच्या शहराच्या सांस्कृतिक वारशाचा एक भाग आहे. इमारतींच्या गर्दीत हे मंदिर दुर्लक्षित राहिले होते, पण आता सर्वांच्या सहकार्याने आम्ही या मंदिराला पुन्हा नवचैतन्य मिळवून देणार आहोत.



# 'गुड फ्रायडे' निमित्त पवित्र नाम देवालय चर्चमध्ये बिशप आशिष पांडला यांचा प्रभू येशू बलिदानाचा विशेष संदेश



**पुणे : वार्ताहर**

गुड फ्रायडे हा ख्रिस्ती धर्मियांचा एक अत्यंत महत्त्वाचा आणि पवित्र सण आहे. जो येशू ख्रिस्ताचा बलिदाना च्या आठवण म्हणून पाळला जातो. गुरुवार पेठ पंच हौद येथील पवित्र नाम देवालय चर्चमध्ये गुड फ्रायडे निमित्त दुपारी विशेष प्रार्थना सभेचे आयोजन केला गेला. यावेळी यावेळी ख्रिस्ती बांधवांनी येशूचे स्मरण करून मौन पाळण्यात आला. बिशप आशिष पांडेला यांचा प्रभू येशू बलिदानाचा विशेष संदेश यावेळी देण्यात आला. यावेळी चर्चचे सचिव मनोज येवलेकर, खजिनदार प्रशांत सूर्यवंशी, सदस्य गिरीश पाठक, दिलीप शेकटकर, विकास उमपती, रोजमेरी साठे, विजया इंदुरकर, प्राजक्ता परोळे, कौमुदी येवलेकर, गौरव अमोलिक, जेकब अमोलिक, विल्सन चक्रे, पवन भोंगे, सुबोध वाघमारे, महेश केणी, जॉन वाघमारे, मोहन मुदलिया, संदीप गायकवाड, नरेश माने, जॉन्सन पिल्ले, राजेंद्र पवार, निखिल टाकळकर, नितीन मोहिते, दिनेश शर्मा, सचिन वाकोडे, तेजस हंगरे, विशाल पटोले, संकेत सूर्यवंशी, फ्रँकिंन डिसूजा, राजेश पारोल, आदी यावेळी उपस्थित होत.

# विरारमध्ये पिसाळलेल्या कुत्र्याने तीन जणांना चावा घेऊन केले जखमी

**विरार : वार्ताहर**

विरार पूर्व परिसरातील देविपाडा, आंबोवाडी आणि चंदनसार परिसरात एका पिसाळलेल्या कुत्र्याने दहशत माजवली असून येथील नागरिकांना कुत्र्याने चावा घेऊन जखमी केले आहे. या घटनेची माहिती मिळताच वसई-विरार शहर महापालिकेच्या आरोग्य विभागाने तातडीने धाव घेत संबंधित कुत्र्याचा शोध घेऊन त्याला जेरबंद केले आहे. वसई विरार शहरात भटक्या कुत्र्यांचा उपद्रव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. विरार पूर्वेकडील देविपाडा, आंबोवाडी, खंडिपाडा, घरतपाडा व एचडीआयएल इंडस्ट्रियल परिसराच्या मागील भागात गेल्या काही दिवसांपासून एक संशयित पिसाळलेला कुत्रा फिरत असून तीन जणांना चावा घेत जखमी केले आहे. याची तक्रार महापौर कार्यालयाला प्राप्त झाली होती. माहिती मिळताच महापौरांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक आरोग्य विभागाच्या श्वान बचाव पथकाने तातडीने या भागात शोधमोहीम राबवून त्या पिसाळलेल्या कुत्र्याला पकडण्यात आले आहे. पिसाळलेल्या कुत्र्याने परिसरातील अन्य १२ कुत्र्यांनाही चावा घेतला होता. खबरदारीचा उपाय म्हणून पालिकेने या १२ श्वानांना पकडून त्यांना 'रिंग लस' दिली असून, पुढील प्रक्रियेसाठी त्यांना श्वान निवारा केंद्रात ठेवण्यात आल्याची माहिती महापालिकेने दिली आहे. पिसाळलेल्या कुत्र्याने चावा घेतल्याने तीन जण जखमी झाले होते.

# पालघर जिल्ह्यातील ग्रामीण भागात पापड-कुरडया बनवण्याची लगबग



**वाडा : वार्ताहर**

गावाकडील भागात सध्या उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर महिलांची पापड आणि कुरडया बनवण्याची लगबग सुरू झाली आहे. घरगुती वापरासाठी वर्षभर पुरतील इतक्या प्रमाणात हे पदार्थ तयार करण्यासाठी महिला प्रखर उन्हातही मेहनत घेताना दिसत आहेत. दरवर्षीप्रमाणे यंदाही उन्हाळा सुरू होताच गावागावांत पापड, कुरडया, सांडगे अशा विविध पदार्थांचे वाळवण करण्यास सुरुवात झाली आहे. सकाळपासूनच महिलांची अंगणात धावपळ सुरू होते. पापड लाटणे, कुरडया तयार करणे आणि त्यांना उन्हात नीट वाळवणे या कामांमध्ये त्या दिवसभर व्यस्त असतात. विशेष म्हणजे, घराघरांत अंगणात, छपरावर किंवा मोकळ्या जागेत पापड-कुरडयांचे वाळवण घातलेले दिसत आहे. कडक उन्हाचा योग्य वापर करून हे पदार्थ टिकाऊ बनवले जातात. पारंपरिक पद्धतीने बनवले जाणारे हे पदार्थ चविष्ट आणि आरोग्यदायी मानले जातात. महिलांच्या या मेहनतीमुळे कुटुंबासाठी वर्षभर पुरेल असा साठा तयार होतो, तसेच काही महिला हे पदार्थ विक्रीसाठीही तयार करून आर्थिक उत्पन्नाचा स्रोत निर्माण करत आहेत. त्यामुळे ग्रामीण भागात महिलांचे हे कष्टमय पण कौतुकास्पद कार्य सध्या सर्वत्र पाहायला मिळत आहे.

# वसई तहसीलदारांनी घेतली तालुक्यातील सर्व पेट्रोल पंप चालक - मालकांची बैठक

## जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश पाळावे व अफवांवर विश्वास ठेवू नये -तहसीलदार दीपक गायकवाड



**वसई : वार्ताहर**

सध्या आंतरराष्ट्रीय स्तरावर अमेरिका-इस्रायल विरुद्ध इराण आणि आखाती देशांमधील तणावामुळे युद्धजन्य परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. या संघर्षाचा जागतिक अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होत असून, इराणने होर्मुझ सामुद्रधुनी रोखल्यास तेलाच्या किमतीत प्रचंड वाढ होऊन जागतिक मंदीची शक्यता वर्तवली जात असल्याचे सोशल मीडियावर पेट्रोल-डिझेल विक्रीमध्ये तुटवडा निर्माण होणार असल्याचे प्रसारित झालेल्या अनुषंगाने जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने पेट्रोल सारख्या ज्वलनशील पदार्थाच्या मुक्त विक्रीमुळे अनुचित घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. सध्या स्थितीचा विचार करून पेट्रोल-डिझेल विक्रीबाबत प्रतिबंधक उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे निदर्शनात आले. पालघर जिल्हा अधिकारी यांनी आदेश जारी केला आहे. त्याचं तंतोतंत पालन करावे व अफवांवर विश्वास ठेवू नये असे वसई तहसीलदार दिपक गायकवाड यांनी आपल्या कार्यालयात घेतलेल्या तालुक्यातील सर्व पेट्रोल पंप मालक, चालक यांच्या बैठकीत चर्चा करताना सांगितले.

जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश येताच वसई तहसीलदार यांनी तालुक्यातील सर्व पेट्रोल पंप मालक चालक यांची तातडी बैठक बोलावली. पेट्रोल पंप चालक मालकांचे म्हणणे होते की पूर्वी आम्हाला पेट्रोल कंपनी १५ ते २० दिवसाचे सवलत मिळत होती, परंतु आता ती आम्हाला मिळत आता आम्हाला रोख रक्कम भरून पेट्रोल मिळते, त्यामुळे शनिवार-रविवार बँकेची सुट्टी असते तेव्हा मात्र पेट्रोल पंपावर पेट्रोल येण्यास उशीर होतो व हॉस्पिटल बँक मोठे टॉवर कंपनी यासारख्या संस्था आमच्याकडून कॅनमध्ये किंवा बॅरलमध्ये डिझेल घेऊन जातात त्यांच्याकडून आम्ही लेखी प्रतिज्ञापत्र घेतलं आहे. सध्या तरी शहरी व ग्रामीण भागात डिझेल-पेट्रोलचा विक्री सुरळीत चालू असल्याचे पेट्रोल विक्रेत्याकडून सांगण्यात आले. हे सर्व तहसीलदार यांनी ऐकून घेतले. व म्हणाले की जिल्हाधिकारी यांनी परिपत्रक जारी केले आहे की पेट्रोल अधिनियम २००२ मधील तरतुदीचा विचार करून डिझेल खुल्या प्लास्टिक बाटली किंवा अनधिकृत मध्ये पेट्रोल पंपावरून भरून देणे विकणे नियमाविरुद्ध आहे आणि बेकायदेशीर असल्याचे तसेच डिझेल फक्त वाहनातच भरावे कोणत्याही कॅन, बाटली डब्बा किंवा इतर कोणत्याही भांड्यात विक्री पुरवठा करू नये, पेट्रोल पंपावर सीसीटीव्ही यंत्रणा कार्यरत ठेवावी विक्रीची नोंद ठेवावी, परंतु डिझेलचा साठा करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध कायदेशीर कडक कारवाई करण्यात येईल. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती-संस्था विरुद्ध पेट्रोल पंप नियम २००२ मधील नियम ११८ व २०२ भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ तसेच आपत्ती व्यवस्थापना कायदा २००५ मधील तरतुदी दंडत्मक व फौजदारी कारवाई करण्यात येईल सर्व संबंधितांनी त्याची तात्काळ अंमलबजावणी करावी. असे जिल्हा अधिकाऱ्यांचे आदेश असल्याचे सांगितले. वसई तहसीलदार यांनी तालुक्यातील सर्व पेट्रोल पंप मालक-चालक यांनी कोणत्याही अफवावर विश्वास ठेवू नये व असा काही घटना घडत असेल तर याची माहिती तहसीलदार यांना कळवावे. बैठकीत वसई तहसीलदार दीपक गायकवाड पुरवठा निरीक्षक भागवत सोनार व इतर अधिकारी उपस्थित होते.

# सेवानिवृत्त पो.उपनिरीक्षक अनिल स्वामी यांचा डीवायएसपी दिलीप सागर यांच्या हस्ते सत्कार



**लातूर : वार्ताहर**

लातूर पोलीस दलातील बिल्ला क्रमांक १ एक म्हणजे वारकरी पोलीस महाराज अशी खास ओळख असलेले वारकरी संप्रदायाचे गाढे अभ्यासक पोलीस उपनिरिक्षक अनिल रामलिंग स्वामी महाराज हे ३४ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेतून नियत वयोमानानुसार ३१ मार्च रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांच्या सेवानिवृत्तीबद्दल लातूर पोलीस अधिक्षक कार्यालयाच्या सभागृहात पोलिस उपअधिक्षक दिलीप सागर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, गौरवपत्र, सन्मानचिन्ह देऊन त्यांचा सहकुटूब सहपरिवार सत्कार करण्यात आला. यावेळी पोलीस कल्याण निधीचे पोलीस निरिक्षक चव्हाण यांची प्रमूख उपस्थिती होती. तसेच यावेळी दहशतवाद विरोधी पथकातील पोलिस उपनिरिक्षक अयूब महेबूब शेख आणि पोलीस हवालदार विजयकुमार मल्लेश यांचाही सेवानिवृत्ती बद्दल सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमात बोलताना पोलीस उपअधिक्षक दिलीप सागर म्हणाले की, सेवानिवृत्ती हा नागरी आयुष्यात सहभागी होण्यासाठीची मोठी उपलब्धी असते. पोलीस दलात कार्यरत असताना कडक अनुशासन आणि शिस्तीचे पालन करताना कुटुंबासाठी पुरेसा वेळ मिळत नसतो. सेवानिवृत्ती नंतर आप आपल्या आवडीच्या क्षेत्रात कार्य करता येते. पोउपनि. अनिल स्वामी यांचे वारकरी संप्रदायातील कार्य आणि ज्ञानेश्वरी ग्रंथाचा अभ्यास दांडगा आहे. तसेच पोलीस सेवेत असताना त्यांनी बहुतांश ग्रामीण भागात सेवा बजावली आहे. आगामी वाटचालीसह त्यांना दीर्घायुष्य आणि दीर्घारोग्य लाभो अशा शुभेच्छा दिल्या. सत्काराला उत्तर देताना पोउपनि. अनिल स्वामी म्हणाले, मी १९९२ मध्ये पोलीस दलात रुजू झालो. गेल्या ३४ वर्षात मुरुड, किल्लारी, औसा, उदगीर, रेणापूर, चाकूर अशा ठिकाणी बहुतांश ग्रामीण भागातच सेवा बजावली आहे. आपल्या घरातील अध्यात्मीक संस्कार, ज्ञानेश्वरीचा अभ्यास आणि ग्रामीण भागातील वारकरी संप्रदायाचा पगडा पाहता पोलीस सेवेतील महाराज अशी ओळख निर्माण झाली. या ज्ञानामुळे गावातील तंटे गावकर्यांच्या मदतीने गावातच सोडविण्यासाठी पुढाकार ...पान ६ वर

# जिल्हास्तरीय शिक्षण आरोग्य व महिला बाल विकास विभागाच्या कर्मचाऱ्यांचा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न




**पालघर : वार्ताहर**

जिल्हा परिषदेच्या विविध विभागांमधील कर्मचाऱ्यांच्या कष्टामुळे जिल्ह्याची प्रगती होऊन विविध स्तरावर पुरस्कार मिळत असून कर्मचाऱ्यांच्या कामाची पोहोच पावती अधिकारी वर्गाला मिळत आहे. शिक्षक, आशा सेविका अंगणवाडी सेविका हे प्रत्येक गावाच्या प्रगतीचे घटक असून गावाच्या विकास कामात असणाऱ्या त्रुटी शोधून त्यावर उपाययोजना असल्यास जिल्हा राज्यात अग्रक्रमी राहील असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी प्रतिपादन केले. जिल्हा परिषदेच्या शिक्षण, आरोग्य तसेच महिला व बालविकास विभागा मध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा पुरस्कार सोहळा गालतरे येथील गोवर्धन इको व्हिलेज येथे आयोजित करण्यात आला होता त्यावेळी मनोज रानडे यांनी कर्मचाऱ्यां समोर मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष चौधरी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) सोनाली मातेकर, महिला व बाल विकास विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी व्यंकट हुंडेकर व इतर मान्यवर उपस्थित होते. जिल्ह्याच्या ग्रामीण भागांमध्ये असणारे रूढी परंपरा बदलण्यास व त्यांच्यामध्ये मत परिवर्तन करण्यासाठी शिक्षक, अशा व अंगणवाडी सेविकांचा मोठा वाटा असून या तिन्ही घटकांकडून गेल्या काही वर्षांपासून चांगले काम होत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे राज्यातील इतर प्रगत जिल्ह्यांपेक्षा पालघर जिल्ह्यातील कुपोषण, बाल व माता मृत्यू संदर्भातील आकडेवारी समाधानकारक असली तरीही त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी वाव असल्याचे मनोज रानडे यांनी सांगितले. जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र ही संदर्भीय ...पान ६ वर


# विरारमध्ये ट्राफिक व फेरीवाल्यांच्या समस्यांवर तक्रार निवारण दिवशीच महत्त्वाचे मुद्दे आले समोर!



**विरार : वार्ताहर**

विरार पोलीस ठाण्यात शनिवारी आयोजित तक्रार निवारण दिवशी परिसरातील विविध समस्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीत विशेषतः वाढत्या ट्रॅफिक समस्येसह अवैध फेरीवाल्यांच्या प्रश्नावर पोलीस अधिकारी, ऑटो युनियनचे प्रतिनिधी आणि स्थानिक नागरिकांनी आपले मत मांडले. बैठकीदरम्यान विरार पूर्व येथील स्टेशन बाजार रोड परिसरात सतत निर्माण होणाऱ्या ट्रॅफिक कोंडीबाबत तीव्र चिंता व्यक्त करण्यात आली. उपस्थित नागरिक व युनियन सदस्यांनी या भागात वाहतूक नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्याची मागणी करत नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आवाहन केले. यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक एल. एम. तुरे यांनी सर्वांचे म्हणणे ऐकून अवैधपणे धावणाऱ्या ऑटो रिक्षांवर वाहतूक पोलीस व आरटीओ यांनी संयुक्त कारवाई करावी, असे सुचवले. तसेच या संदर्भात अपेक्षित प्रमाणात कारवाई होत नसल्याची कबुली देत सुधारणा करण्याची गरज असल्याचे त्यांनी मान्य केले. बैठकीत विरार तलाव परिसरात उभे राहणारे अवैध ठेले-विशेषतः काळे, पिवळे व हिरवे ठेले-यांच्याबाबतही तक्रारी मांडण्यात आल्या. मनपाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, या अवैध फेरीवाल्यांमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होतो आणि नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागतो, असे सांगण्यात आले. ...पान ६ वर

लग्नाला २५ वर्ष पुर्ण करणाऱ्या वैंशाली व अजीत तांडेल या दाम्पत्याला हार्दिक शुभेच्छा!





* शुभेच्छुक *
सुनील रघुनाथ फलके
(जिल्हाध्यक्ष : राष्ट्रवादी अजितदादा असंघटित कामगार संघटना)

# पालघर जिल्हा प्रशासन व श्रमजीवी संघटना हातात हात घालून करणार पाणी टंचाईवर मात




**वाडा : वार्ताहर**

जिल्ह्यात सुरू असलेल्या भीषण पाणी टंचाईवर मात करण्यासाठी श्रमजीवी संघटनेचे सहकार्य घेतले जाईल. असे पालघर जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी सांगितले. जिल्ह्यातील भीषण पाणीटंचाई संदर्भात श्रमजीवी संघटनेच्या शिष्टमंडळाशी ते स्वतंत्र्यपणे बोलत होते. संघटनेच्या शिष्टमंडळाने जिल्ह्यातील तीव्र पाणी टंचाई मनोज रानडे यांच्या निदर्शनास आणून दिली. शासनाच्या पाणीटंचाई आराखड्यात राहून गेलेले गाव-पाडे संघटनेने निदर्शनास आणून दिल्याबद्दल रानडे यांनी श्रमजीवी संघटनेचे आभार मानले. श्रमजीवी संघटनेने दिलेल्या निवेदनानुसार पालघर जिल्ह्यातील वाडा (५८), तलासरी (२०), मोखाडा (६२), डहाणू (१४), वसई (४१), जव्हार (१३) आणि विक्रमगड (३४) अशा मोठ्या प्रमाणावर गाव-पाड्यांमध्ये पाणीटंचाई निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर तातडीने टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा, जिथे शक्य आहे तिथे बोअरवेल उपलब्ध करून द्याव्यात तसेच पाणीटंचाई निवारणासाठी ठोस कृती आराखडा तयार करावा, अशी मागणी करण्यात आली. श्रमजीवी संघटनेच्या शिष्टमंडळाने ३१ मे पर्यंत आधार कार्ड नसलेल्या व्यक्तींना आधारकार्ड मिळवून देण्याबाबत करावयाच्या कृती कार्यक्रमाची चर्चा केली. तसेच वन अधिकार प्रलंबित दाव्या बाबत अजूनही ग्रामपंचायत स्तरावर ८८३१ व जिल्हा स्तरावर ३३४५ इतके वनदावे प्रलंबित असल्याचे वास्तव मांडले यावर रानडे यांनी तात्काळ कार्यवाही करण्याबाबत ग्वाही दिली.दरम्यान, पालघर जिल्हा परिषद मुख्यकार्यकारी अधिकारी यांना निवेदन देण्यासाठी संघटनेच्या संघटक सचिव सीता घाटाळ, जिल्हाध्यक्ष ...पान ६ वर

# 'ईस्टर संडे' निमित्त पवित्र नाम देवालय चर्चमध्ये विशेष प्रार्थना आणि भक्ती गीत



**पुणे : वार्ताहर**

प्रभू येशूचे पुनरुत्थान चा दिवस ईस्टर संडे रविवार हा दिवस दुःखाकडून आनंदाकडे जाण्याचे प्रतीक मानले जाते. हा दिवस ईस्टर संडे म्हणून साजरा केला जातो. गुरुवार पेठ पुणे पंच हौद येथील पवित्र नाम देवालय चर्चमध्ये विशेष प्रार्थना सभेचे आयोजन आणि भक्ती गीत सादर करण्यात आले होते. सकाळी सुवार्ता मिरवणूक झाली. यावेळी कार्यक्रमाचे आयोजन सचिव.मनोज येवलेकर, विकास उमापती, विजया इंदूरकर, रॉसमेरी साठे, शिरिश पाठक, प्रशांत सूर्यवंशी, प्राजक्ता परोल, कौमुदी येवलेकर, यांनी केले. तसेच संदीप गायकवाड, विलसन चक्रे, पवन भोगे, राजेंद्र पवार ...पान ६ वर

# वसई किल्ल्यातील पोर्तुगीजकालीन ख्रिस्त मंदिर कृसाची वाट प्रार्थना उपक्रम व सात ख्रिस्त मंदिराची इतिहास मार्गदर्शन सफर



**वसई : वार्ताहर**

कोळी एकता चॅरिटेबल ट्रस्ट व कोळी एकता मंच यांच्या संयुक्त विद्यमाने जंजिरे वसई किल्ल्यातील पोर्तुगीजकालीन ख्रिस्तमंदिर कृसाची वाट प्रार्थना उपक्रम व सात ख्रिस्तमंदिराची इतिहास मार्गदर्शन सफर आयोजित करण्यात आलेली होती. वसई कोळीवाडा, पाचूबंदर, वसई प्रांतातील १०० हून अधिक स्थानिक व पंचक्रोशीतील भाविकांनी सदर उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला. सकाळी ८ ते दुपारी १२ या वेळेत झालेल्या उपक्रमात १०० हुन अधिक स्थानिक भाविक, दुर्गमित्र, कोळी एकता मंच प्रतिनिधी, इतिहासप्रेमी, दुर्गमित्र इत्यादी सक्रिय सहभागी झालेले होते. उपक्रमात ऐतिहासिक वसई किल्ल्यातील पोर्तुगीजकालीन एकूण सात ख्रिस्तमंदिरांना प्रत्यक्षात भेट देऊन तेथील इतिहास जाणून घेण्यात आला. किल्ले वसई मोहिमेचे इतिहास अभ्यासक व प्रमुख श्रीदत्त नंदकुमार राऊत यांनी उपस्थित प्रतिनिधींना मार्गदर्शन केले. दरवर्षी स्थानिक लोकांना किल्ल्याविषयी असणारी जिज्ञासा लक्षात घेऊन त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी श्रीदत्त राऊत सेवाभावी भावनेने उपक्रमात योगदान देतात. राऊत सरांनी आज ६२४ वी इतिहास मार्गदर्शन सफर पूर्ण केली. यावेळी ख्रिस्तमंदिराचे वास्तुविशेष, यातील महत्वाचे शिलालेख, येत्या काळातील किल्ल्यातील वास्तूंची संवर्धनाची गरज, त्यामागील इतिहास संदर्भ, जुने नकाशे, आगामी काळातील श्रमदान ...पान ६ वर

# निर्भय बनो आंदोलनास 'निर्भय पुरस्कार' प्रदान!




**वसई : वार्ताहर**

वसईतील ख्यातनाम निर्भय जनसंस्थेने यंदाचा सन २०२६ पुरस्कार 'निर्भय बनो आंदोलन' या जागरण चळवळीला दि. २१ मार्च २०२६ रोजी प्रदान करण्यात आला. यावेळी वसई धर्मप्रांताचे बिशप थॉमस डिसोझा ह्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात निर्भय बनो आंदोलनाचा तसेच निर्भय जनसंस्थेचा यथोचित गौरव केला. प्रमुख पाहुणे ज्येष्ठ पत्रकार व विचारवंत उत्तम कांबळे या प्रसंगी म्हणाले की, या देशाच्या नागरिकांचे मूलभूत विचार आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य हिरावून घेतले जाण्याचे सर्वत्र भीतीचे वातावरण असताना, निर्भय जनसंस्था जनजागृती करून सर्वांना भयमुक्त करण्याचे प्रशंसनीय कार्य करीत आहे. सदर कार्यक्रमाचे औचित्य साधून निर्भय जनसंस्थेचा या ३३ व्या वर्धापन दिनी विषेशांक प्रकाशित करण्यात आला. या प्रसंगी कला, क्रीडा व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या स्थानिक गुणवंतांचा मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. त्यामध्ये तरुण क्रिकेटपटू आयुष म्हात्रे, झील डिमेलो, सिरिल गोन्साल्वीस, वसई जनहित ट्रस्ट, नानभाट आधार संघटना, योगगुरू मायकल परेरा तसेच डॉमनिक डायस आणि रॉबिन लोपीस यांचा सत्कारमूर्तींमध्ये सहभाग होता. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष रेव्ह. बिशप थॉमस डिसोजा (वसई) होते, तर उत्तम कांबळे (ज्येष्ठ पत्रकार व विचारवंत) प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. आपल्या प्रभावी व विचारप्रवर्तक भाषणातून दोन्ही मान्यवरांनी उपस्थितांची मने जिंकली व निर्भय विचारांची गरज अधोरेखित केली. कार्यक्रमात विविध मान्यवरांची उपस्थिती, अथक ...पान ६ वर